- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, ३१ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३२ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**

- ✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- ✔ चांदी : २,३८,३००/-

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# आंदोलकांवर कारवाई होणार नाही !

## केंद्रीय गृह मंत्रालयाचा आदेश जारी, विद्यार्थ्यांना दिलासा



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
दिल्लीतील जंतरमंतरवर नीट पेपरफुटी प्रकरणी करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावेळी आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आला. यावेळी पोलिसांनी बळाचा वापर करत विद्यार्थ्यांना मारहाण केली. लाठीचार्ज, अश्रूधुराच्या नळकांड्याही फोडल्या. त्यामुळे येथे हिंसाचार झाल्याचे देशाने पाहिले. अखेर आंदोलनकर्त्यांनी मागणी मान्य करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आंदोलन मागेही घेण्यात आले. मात्र, आंदोलक विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल झाले, काहींना ताब्यात घेण्यात आले तर काहींना अटक झाली. आता केंद्रीय गृहमंत्रालयाने महत्त्वाचा आदेश जारी केला आहे. आंदोलकांवर कुठलाही कायदेशीर कारवाई होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आलंय.

दिल्ली सरकारच्या गृह विभागाने नीट परीक्षेतील कथित गैरप्रकारांविरोधात झालेल्या आंदोलनांसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला असून, आंदोलकांविरोधात कोणतीही कठोर कायदेशीर कारवाई न करण्याचे स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने २८ जुलै २०२६ रोजी शैलेंद्र मणी त्रिपाठी विरुद्ध भारत सरकार व इतर या प्रकरणात दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर सर्व बाबींचा साकल्याने विचार करून दिल्ली सरकारने हा निर्णय घेतला. दिल्ली सरकारच्या निर्णयानुसार आंदोलनात सहभागी असलेल्या व्यक्तींविरोधात दिल्लीतील कोणत्याही पोलिसांकडून कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार नाही.

आंदोलनात सहभागी व्यक्तींविरोधात यापुढे कोणतीही कारवाई प्रस्तावित नसून, हे प्रकरण कायमस्वरूपी बंद करण्यात येत आहे. दरम्यान, २९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहारांच्या संदर्भात झालेल्या आंदोलनांशी संबंधित एकूण १३ गुन्ह्यांची नोंद दिल्ली पोलिसांनी केली होती. मात्र, आता हे गुन्हे मागे घेण्यात येणार आहेत. दिल्लीच्या उपराज्यपालांच्या मंजुरीने हा निर्णय जारी करण्यात आल्याची माहिती प्रेसनोटच्या माध्यमातून गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी दिली.

**गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास कारवाई**
मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना हे संरक्षण लागू होणार नाही. या प्रकरणांत यापूर्वी अटक, स्थानबद्धता झाली असल्यास संबंधितांची सुटका करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू केली जाईल, असे गृह विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

**कॉकरोच जनता पार्टीची मागणी**
दिल्लीतील आंदोलनावेळी झालेल्या हिंसाचारानंतर विद्यार्थी व आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. मात्र, कॉकरोच जनता पार्टीसोबत सरकारच्या शिष्टमंडळाच्या झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांवर कुठलीही कायदेशीर कारवाई होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार केंद्रीय गृह मंत्रालयाने ही मागणी मान्य केल्याचे सांगण्यात आले.

# मराठवाड्यात पावसाची दमदार हजेरी

**वृत्तसंस्था, जालना**
मुंबई, पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात यंदा पावसाने दमदार हजेरी लावल्याचे दिसून आले. शहरांमध्ये आलेल्या पावसामुळे धरणे भरली असून पिण्याच्या पाण्याची चिंता मिटल्याचे बोलले जाते. मात्र, अद्यापही शेतकरी पावसाची वाट पाहात असून मराठवाड्यातही हवा तेवढा पाऊस नसल्याने बळिराजा काळजीत होता. मात्र, मराठवाड्यातही पावसाने दमदार हजेरी लावली. अनेक जिल्ह्यांत पावसाने दमदार हजेरी लावली असून हवामान विमानानेही रेड अलर्ट जारी केला आहे. तर, विदर्भातही मुसळधार पाऊस सुरू असून काही नद्यांना पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

मराठवाड्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. मात्र, आज जालना जिल्ह्यातील जालना, बदनापूर, अंबड, मंठा आणि घनसावंगी तालुक्यांसह जिल्ह्यातील अनेक भागांत जोरदार पाऊस बरसला. या पावसामुळे पिकांना मोठा दिलासा मिळाला असून उघडिपीमुळे आलेला ताणही कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, खरीप पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा शेतक-यांनी व्यक्त केली आहे. दुसरीकडे विदर्भातही ३० आणि ३१ जुलै रोजी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर विदभार्तील यवतमाळ, अमरावती, भंडारा, गडचिरोली जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर वाशिम, अकोला, वर्धा, चंद्रपूर या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, नागपूर आणि बुलडाणा जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट आहे.

**नांदेडला रेड अलर्ट**
३० जुलै रोजी नांदेड जिल्ह्यासाठी दुपारी ४ वाजेपर्यंत रेड अलर्ट घोषित करण्यात आला आहे. तसेच ३० जुलै २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, तसेच नागरिकांनीही सुरक्षिततेचे नियम काटेकोरपणे पाळावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## थोडक्यात

### युद्ध पुन्हा पेटले

**तेहरान :** अमेरिका आणि इराणमधील युद्ध पुन्हा भडकले आहे. दोन्ही देशांमध्ये भीषण हवाई हल्ले सुरू असल्याने आखातात युद्धाचे सायरन वाजू लागले आहेत. २८ फेब्रुवारीला सुरू झालेले युद्ध मधल्या काळामध्ये थांबले होते आणि शांतता करार झाला होता. मात्र त्यानंतर अचानक हा करार मोडला आणि हवाई हल्ले सुरू झाले. इराणने दोन दिवसांपूर्वी जॉर्डनमधील अमेरिकन लष्करी तळांवर आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील जहाजांवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी हल्ला केला होता. या हल्ल्याला आता अमेरिकेने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. अमेरिकन सैन्याने बुधवारी उशिरा इराणमधील अनेक महत्त्वाच्या सैन्य तळांवर भीषण हवाई हल्ले केले. अमेरिकन सेंट्रल कमांडने याबाबत माहिती दिली आहे. इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सच्याअनेक ठिकाणांना या हल्ल्यात लक्ष्य करण्यात आल्याचे अमेरिकन सेंट्रल कमांडने स्पष्ट केले. मंगळवारी इराणने जॉर्डनमधील अमेरिकन लष्करी तळ आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांवर क्षेपणास्त्रे डागली होती. अमेरिकन सैन्याने इराणची सर्व क्षेपणास्त्रे हवेतच यशस्वीरीत्या नष्ट केली. या हल्ल्यानंतर अवघ्या २४ तासांच्या आत अमेरिकेने इराणवर मोठा प्रतिहल्ला केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या हल्ल्याचा इशारा दिला होता.

**अत्यंत जोरदार प्रहार करणार**
आम्ही इराणावर अत्यंत जोरदार प्रहार करणार आहोत, कारण आता हल्ला करण्याची आमची पाळी आहे. आम्ही काय करणार आहोत याची त्यांना पूर्ण कल्पना आहे असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर अमेरिकन लष्कराने इराणचे लष्करी कमांड सेंटर्स, क्षेपणास्त्र आणि ड्रोननिर्मिती केंद्र, किनारी देखरेख यंत्रणा तसेच सागरी युद्धक्षमता असलेल्या तळांवर एकापाठोपाठ एक हल्ले केले.

# १२ वर्षात सव्वा लाख विद्यार्थ्यांच्या आत्महत्या

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यसभेत दावा केला की, पंतप्रधान मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात १.२५ लाख विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. खरगे यांनी नमूद केले की, या १२ वर्षांच्या काळात शिक्षणमंत्र्यांनी पहिल्यांदाच राजीनामा दिला.



पेपरफुटीचा मुद्दा आणि विद्यार्थ्यांची आंदोलने यांबाबत सरकारने विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. नंतर जे.पी. नड्डा यांनी त्यांना बैठकीसाठी बोलावले. जर हे आधीच झाले असते, तर विद्यार्थ्यांना लाठीमाराचा सामना करावा लागला नसता. खरगे म्हणाले की, पेपरफुटीशी संबंधित सार्वजनिक परीक्षा (अयोग्य मार्गांचा प्रतिबंध) सुधारणा विधेयकमध्ये काहीही नवीन नाही. केवळ आकडेवारी बदलली आहे. याचा काहीही फरक पडणार नाही. प्रश्नपत्रिका चोरणारे मोकाट सुटतच राहतील, तर विद्यार्थ्यांना मात्र मारहाण सहन करावी लागेल. यापूर्वी, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत पेपरफुटीशी संबंधित विधेयक मांडले. जवळपास सात तास चाललेल्या चर्चेनंतर बुधवारी लोकसभेत हे विधेयक मंजूर करण्यात आले होते.

**सरकार दबावाखाली झुकले**
विद्यार्थी आंदोलन आणि जनमताच्या दबावामुळे सरकारला माघार घ्यावी लागली. धर्मेंद्र प्रधान यांना हटवणे आणि सुधारणा विधेयक आणणे हे विद्यार्थ्यांच्या हितासाठी केलेले नसून, सरकारची प्रतिष्ठा वाचवण्याच्या मजबुरीपोटी केले गेले आहे.

**दंड वाढवून पेपरफुटी थांबणार नाही**
दंड १ कोटींवरून १० कोटींपर्यंत वाढवणे, शिक्षा कठोर करणे आणि विशेष कृती दल किंवा जलदगती न्यायालये स्थापन करणे पुरेसे नाही. खरी गरज परीक्षा प्रणाली पारदर्शक करण्याची आहे.

**१५२ परीक्षांमध्ये पेपरफुटी**
गेल्या काही वर्षांत १५२ परीक्षांचे पेपर फुटले आहेत, तरीही एकाही दोषीला शिक्षा झालेली नाही. एनटीए मधील अनेक पदे रिक्त आहेत आणि शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याऐवजी आरएसएसशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती केली जात आहे.

**शहा यांनी उत्तर द्यावे**
शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार, अश्रूधुराचा वापर आणि पेलेट गन्सचा वापर करण्यात आला. गृहमंत्री अमित शहा यावर उत्तर देऊ शकत नसतील, तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे.

**शूद्र विधानावरून गदारोळ**
नवीन अभ्यासक्रमात अशा तरतुदींचा समावेश केला जात आहे ज्यात वेद ऐकणाऱ्या किंवा त्याचे पठण करणाऱ्या शूद्रांसाठी कठोर शिक्षेची शिफारस आहे. ज्यांची मानसिकता अशी आहे, त्यांना शिक्षण व्यवस्थेतून काढून टाकले पाहिजे, असे त्यांनी म्हटले. या विधानामुळे सत्ताधारी पक्षात मोठा गदारोळ निर्माण झाला.

# निवृत्त बस चालकाच्या घरात सापडले घबाड






**वृत्तसंस्था, बीरभूम**
पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील एका निवृत्त बसचालकाच्या घरावर पोलिसांनी छापा टाकला. या बस चालकाच्या घरातून तब्बल २८ कोटींची रोकड व १५ किलो सोन्याची बिस्कीटें जप्त करण्यात आली आहेत. मीनार मोंडल असे त्या बस चालकाचे नाव आहे. रोख रक्कम आणि सोने जप्त केल्यानंतर पोलिसांनी मीनार मोंडल याला अटक केली आहे. चौकशीदरम्यान त्याने कबूल केले की, ही सर्व मालमत्ता टुलू मोंडल आणि त्यांच्या बेकायदेशीर व्यापाराची आहे. रात्री उशिरा मारलेल्या छाप्यात सुरुवातीला ५.५ कोटी रुपयांची रोकड आणि १५ किलो सोने जप्त करण्यात आले होते. नंतर अधिक शोधाशोध केल्यानंतर आणखी तेवीस कोटी रुपये पोलिसांना सापडले.

ही रोकड मोजताना पोलिसांच्या रोकड मोजणाऱ्या तब्बल पाच मशिन बंद पडल्या. मिनार मोंडल हा तृणमूल काँग्रेसचे माजी नेते अनुब्रत मोंडल यांचा निकटवर्तीय आणि हिरे व्यापारी टुलू मोंडल यांचा नातेवाईक आहे.

# पेपर लिक विधेयक राज्यसभेतही मंजूर

## विरोधकांचा सभात्याग, राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर कायद्यात रुपांतर

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
लोकसभेनंतर राज्यसभेतही पेपर लिक विरोधी दुरुस्ती विधेयक मंजूर केले. हे विधेयक आता राष्ट्रपतींकडे जाईल आणि त्यांची संमती मिळाल्यानंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह सरकारच्या वतीने विधेयकावर उत्तर देण्यासाठी उभे राहिले, तेव्हा विरोधकांनी सभात्याग केला. यापूर्वी राज्यसभेतील चर्चेदरम्यान जोरदार वाद झाला. राज्यसेभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल करीत आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या मुद्यावरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह



यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी लावून धरली. आरजेडी खासदार मनोज झा यांनी राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए) रद्द करण्याची मागणी केली आणि तिला बंगालच्या उपसागरात फेकून द्यावे, असे म्हटले. या नेत्यांसह इतर सदस्यांनी विधेयकाच्या मुद्यावरून भूमिका ठासून मांडली. सुमारे ८ तास चर्चा आणि वादविवाद झाल्यानंतर पेपर लिक प्रतिबंधक सुधारणा विधेयक राज्यसभेतही मंजूर करण्यात आले.

रात्री सव्वाआठपर्यंत चाललेल्या कामकाजानंतर राज्यसभेचे कामकाज ३१ जुलैपर्यंत तहकूब करण्यात आले. मतदानाच्या वेळी विरोधी पक्ष उपस्थित नव्हता. विरोधी पक्षाचे खासदार जॉन ब्रिटास, ए. ए. रहीम, हरीश बीरन आणि संतोष कुमार यांनी विधेयकातील काही कलमांमध्ये दुरुस्तीसाठी नोटिसा सादर केल्या होत्या. पी. विल्सन आणि तिरुची शिवा यांनी दुरुस्त्या सुचवल्या, ज्या सभागृहात मंजूर होऊ शकल्या नाहीत. हे विधेयक राज्यसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले.

**गृहमंत्र्यांची अनुपस्थिती, विरोधकांचा सभात्याग**
जेव्हा सभापतींनी जितेंद्र सिंह यांना सरकारची बाजू मांडण्यासाठी बोलावले, तेव्हा विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभात्याग केला. प्रमोद तिवारी म्हणाले की, सर्व विरोधी सदस्यांनी एकच मुद्दा उपस्थित केला आणि चर्चा संपण्यापूर्वी गृहमंत्री सभागृहात परत येतील, अशी अपेक्षा होती. यानंतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी गृहमंत्री, सभागृहात या, अशा घोषणा देत सभात्याग केला.

**विश्वासार्हतेच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल**
आम्ही संसदेत विधेयक आणले. ते संसदेच्या दोन्ही सभागृहांत दीर्घ चर्चेनंतर कठोर कायदे आणि तरतुदींसह विधेयक मंजूर केले. आता एका विश्वासार्ह परीक्षा प्रणालीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. हे कार्य पुढेही चालू राहील, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदी यांनी एक व्हीडीओ शेअर करीत दिली.



संपादकीय लेखणीतून...

## विद्यार्थ्यांना दिलासा

नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी मोठा दिलासा दिला. कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या आंदोलकांच्या विरोधात कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई केली जाऊ नये तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या १८ वर्षांखालील आंदोलकांची त्वरित सुटका करावी असे आदेश न्यायालयाने दिले. या संदर्भात दिल्ली, महाराष्ट्र, बिहार, केरळ, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांच्या मुख्य सचिवांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जंतरमंतरवरील आंदोलनादरम्यान पोलिसांकडून मोठ्या प्रमाणावर अत्याचार आणि बळाचा वापर करण्यात आल्याचा आरोप करणाऱ्या अनेक याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. शांततापूर्ण मार्गाने होत असलेले आंदोलन हा लोकशाहीचा अभिन्न भाग आहे, असे खंडपीठ म्हणाले.

देशभरात विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या घटनांची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी करण्याची आवश्यकता न्यायालयाने बोलून दाखवली. आंदोलनादरम्यान अतिरिक्त बळाचा वापर झाला असल्यास, नियमांचे उल्लंघन झाले असल्यास त्याबद्दलची जबाबदारी निश्चित व्हायला हवी, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सुनावणी दरम्यान खंडपीठाने नमूद केले की, ज्यांनी कायद्याचे उल्लंघन केले त्यांना जबाबदार धरले पाहिजे. आंदोलकांवर पेलेट गन, खिळे लावलेल्या काठ्या आणि इलेक्ट्रॉनिक काठ्यांचा वापर करण्यात आल्याचे गंभीर आरोप याचिकांमध्ये करण्यात आले असून, यात अनेक विद्यार्थी आणि तरुण महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. आंदोलनादरम्यान २५० हून अधिक पोलिस कर्मचाऱ्यांवर झालेल्या हल्ल्यांचीही निष्पक्ष चौकशी करण्यात येणार असून, त्यामुळे हे हल्ले विद्यार्थ्यांनी केले की समाजकंटकांनी ते स्पष्ट होऊ शकेल. सर्व संबंधित राज्यांनी आंदोलनाशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज, ड्रोन रेकॉर्डिंग, बॉडी कॅमेरा फुटेज, वायरलेस संदेश आणि पीसीआर लॉग सुरक्षित ठेवावेत. आंदोलकांचा गोळा केलेला कोणताही डिजिटल डेटा सार्वजनिक केला जाऊ नये असे निर्देश न्यायालयाने दिले.

दिल्ली पोलिसांना एफआयआरचा तपास सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र या प्रकरणाची सुनावणी प्रलंबित असेपर्यंत कोणत्याही आंदोलकावर कठोर कारवाई केली जाऊ नये असेही बजावले आहे. फेशियल रेकग्निशन सिस्टिम आणि अन्य तांत्रिक माध्यमातून गुन्हेगाराची ओळख पटल्याची माहिती पोलिसांनी दिली. आंदोलनात सहभागी झालेल्यांमध्ये हत्या, लैंगिक अत्याचार, पॉक्सो, लूट यासह अन्य गंभीर प्रकरणांमधील आरोपी असल्याचा दावा दिल्ली पोलिसांनी केला आहे. सीजेपीच्या आंदोलनात हत्येचे आरोप असलेले ६२, लूटमार आणि दरोड्याचा आरोप असलेले २८४, पोक्सोचे ६, महिलांविरोधातील गुन्हे दाखल असलेले २५, शस्त्रकायद्याच्या अंतर्गत असलेले २२९, अपहरणाचा आरोप असलेले १९ आणि एनडीपीएस कायद्याच्या अंतर्गत गुन्हे दाखल असलेले ६७ आरोपी होते, अशी आकडेवारी दिल्ली आंदोलनादरम्यान पोलिसांवरील हल्ल्याचा उल्लेख करत सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने म्हटले की, प्रथमदर्शनी या आरोपांची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे.

त्याच विश्वासावर आंदोलन मागे घेण्यात आले होते. न्यायालयाच्या आदेशाचा राजकीय शस्त्र म्हणून वापर केला जाऊ शकतो आणि शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यावर पुन्हा कारवाई केली जाऊ शकते, असा संशय सीजेपीने व्यक्त केला आहे. केंद्र सरकारला दिलेली मुदत संपली असून सरकारने ठरल्यानुसार सर्व एफआयआर तात्काळ मागे घेतले नाहीत, विद्यार्थ्यांना सोडले नाही तर पुन्हा एकदा संपूर्ण देशात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा सीजेपीने दिला आहे. जंतरमंतरवरील ह्यजेन-झीला आवाहन करताना पंतप्रधान मोदींनी फ्रेंड्स असे संबोधले होते. त्याच जेन-झीला भाजप खासदार, अभिनेत्री कंगना राणावतने जनरेशन गटर असा आक्षेपार्ह उल्लेख करून विनाकारण वाद ओढवून घेतला आहे. कंगनाला भाजपमध्ये कोणीही गांभीर्याने घेत नाही. कंगनाने आंदोलनात सहभागी झालेल्या तरुणांच्या संगोपनावर आणि तरुणींच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित करत टीका केली होती. सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास यांनी प्रत्युत्तर देताना लोकप्रतिनिधींनी आपल्या पदाची प्रतिष्ठा राखून संयमित भाषेचा वापर करावा असा सल्ला दिला आहे.

# 'नीट' परीक्षा घोटाळ्यात आत्महत्येच्या मालिकेत नागपूरच्या आकांक्षाचा बळी

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

देशभरात गाजलेल्या 'नीट' पेपर लीक आणि परीक्षा घोटाळ्याचे अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारे दुष्परिणाम आता समोर येत आहेत.या परीक्षा व्यवस्थेतील गोंधळाने केवळ विद्यार्थ्यांची स्वप्नेच धुळीस मिळवली नाहीत, तर हसतीखेळती कुटुंबे उद्ध्वस्त केली आहेत. नागपूरमध्ये वैद्यकीय शिक्षणाची तयारी करणाऱ्या १८ वर्षीय आकांक्षा ऊर्फ स्नेहा चतुर्वेदी या विद्यार्थिनीने पेपर लीक प्रकरणातील अनिश्चिततेमुळे काही दिवसांपूर्वी आत्महत्या केली. या धक्कादायक घटनेनंतर चतुर्वेदी कुटुंब पूर्णपणे कोलमडले असून, लेकीच्या निधनाचा धक्का सहन न झाल्याने तिच्या वडिलांना दोन वेळा हृदयविकाराचा आणि अर्धांगवायूचा पॅरालिसिसचा तीव्र झटका आला आहे.

ही अत्यंत दुर्दैवी घटना जुलै २०२६ मध्ये नागपूर (महाराष्ट्र) येथे घडली. आत्महत्या करणारी १८ वर्षीय विद्यार्थिनी आकांक्षा चतुर्वेदी ही मूळची मध्य प्रदेशातील मऊगंज जिल्ह्यातील मगनिया गावची रहिवासी होती. ती नागपुरात राहून वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करत होती, मात्र परीक्षेतील अनिश्चितता आणि पेपर लीकच्या मानसिक तणावातून तिने नागपूर येथील राहत्या घरात आपले जीवन संपवले.

मूळची मध्य प्रदेशातील मऊगंज जिल्ह्यातील मगनिया गावची असलेली आकांक्षा नागपुरात राहून नीट परीक्षेची तयारी करत होती. अत्यंत हुशार असलेल्या आकांक्षाला या परीक्षेत ६५० हून अधिक गुण मिळण्याची पूर्ण खात्री होती. मात्र, परीक्षेतील सावळागोंधळ, पेपर लीकचे आरोप आणि त्यानंतर निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे ती प्रचंड मानसिक तणावाखाली होती. "माज्यात पुन्हा परीक्षा देण्याची हिंमत उरलेली नाही," अशी हृदयद्रावक सुसाईड नोट लिहून अखेर तिने आपले जीवन संपवले.

आकांक्षाचे वडील कृष्ण कुमार चतुर्वेदी हे अल्पभूधारक शेतकरी आहेत. लेकीला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपली शेतजमीन आणि घरातील दागिने विकले होते, तसेच लाखो रुपयांचे कर्जही काढले होते. नागपूरमध्ये लेकीच्या शिक्षणाचा आणि राहण्याचा खर्च भागवण्यासाठी तिच्या वडिलांनी केटरिंगचे कामही केले होते. मात्र, ज्या लेकीसाठी आपले सर्वस्व पणाला लावले, तिनेच जगाचा निरोप घेतल्याने कृष्ण कुमार यांना तीव्र मानसिक धक्का बसला. या धक्क्यामुळे त्यांना दोन वेळा हृदयविकाराचा झटका आला, तसेच अर्धांगवायू झाला. सध्या त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असून त्यांना बोलताही येत नाहीये आणि हालचाल करणेही कठीण झाले आहे.

**"दोषींना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे!" – आईची आर्त हाक**

आकांक्षाच्या आई नीलम यांनी अश्रूंना वाट मोकळी करून देत आपल्या भावना व्यक्त केल्या. "धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला असला तरी माझी मुलगी परत येणार नाही. पेपर लीक करणाऱ्या आणि या गैरकारभाराला जबाबदार असणाऱ्या दोषींना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे, तरच माज्या लेकीच्या आत्म्याला शांती मिळेल," अशी संतप्त आणि आर्त मागणी त्यांनी केली आहे. मुलीच्या निधनानंतर आता घरातील उरलीसुरली जमापुंजी पतीच्या उपचारांवर खर्च होत असल्याचे त्यांनी सांगितले. एका बाजूला तरुण मुलीचा मृत्यू आणि दुसऱ्या बाजूला पतीची गंभीर प्रकृती यामुळे संपूर्ण कुटुंब आर्थिक आणि मानसिक संकटात सापडले आहे.

**यंदा देशात १४ हून अधिक विद्यार्थ्यांचा बळी; परीक्षा बनली 'डेथ ट्रॅप' ?**

आकांक्षाची ही आत्महत्या केवळ एक सुटी घटना नाही. यंदा २०२६ मध्ये 'नीट' परीक्षेतील गोंधळ, पेपर लीक आणि फेरपरीक्षेच्या मानसिक दबावामुळे देशभरात आतापर्यंत किमान १४ हून अधिक विद्यार्थ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली आहे. गेल्या पाच वर्षांतील आकडेवारी पाहिली तर हा आकडा ९० च्या पार गेला आहे. महाराष्ट्रातील नागपूरच्या आकांक्षासोबतच नुकतीच अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथील १९ वर्षीय अंकिता संगळे या विद्यार्थिनीनेही याच मानसिक तणावातून टोकाचे पाऊल उचलले. कोटा (राजस्थान), उत्तर प्रदेश, गोवा आणि दिल्लीतूनही अशाच अत्यंत दुर्दैवी घटना समोर आल्या आहेत, ज्यामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**राजकारणापलीकडे जाऊन संवेदनशीलतेची गरजः**

जेव्हा नीट परीक्षा घोटाळ्यासारख्या प्रशासकीय त्रुटींमुळे देशाचे उज्ज्वल भविष्य असणारे गुणवंत विद्यार्थी आपले आयुष्य संपवतात, तेव्हा केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप किंवा राजीनाम्यांचे खेळ अत्यंत फोल आणि अर्थहीन वाटू लागतात. खऱ्या अर्थाने ही वेळ राजकारणाची नसून तीव्र संवेदनशीलतेची आहे. अशा कठीण प्रसंगी केवळ कागदी घोषणा किंवा टीव्हीवरील विधानांपेक्षा, जबाबदार नेत्यांनी प्रत्यक्ष पीडित कुटुंबांच्या घरी जाऊन त्यांचे अश्रू पुसणे आणि त्यांच्या अथांग दुःखात सहभागी होणे ही एक किमान मानवतावादी पायरी असायला हवी.

केवळ सांत्वनाने किंवा दिलगिरीने गेलेली व्यक्ती कधीही परत येऊ शकत नाही; परंतु ज्या व्यवस्थेच्या गोंधळामुळे हे घडले, त्या व्यवस्थेच्या प्रमुखांनी प्रत्यक्ष भेट देऊन कृतज्ञता दाखवल्यास कुटुंबाला एक मोठा भावनिक आधार मिळतो. अशा घटनांनंतर केवळ सरकारी आर्थिक मदत जाहीर करून विषय संपवण्यापेक्षा, चतुर्वेदी कुटुंबासारख्या मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या पूर्णपणे खचलेल्या माता-पित्यांना आज काळजीची, आदराची आणि 'आम्ही तुमच्यासोबत आहोत' या आत्मिक पाठबळाची नितांत गरज आहे. देशाचे भविष्य असणाऱ्या तरुण पिढीचे प्राण आणि त्यांच्या पालकांचे मानसिक स्थैर्य हीच कोणत्याही सरकारची पहिली प्राथमिकता असायला हवी.

– ९५६१५९४३०६

# अजिंक्य रहाणेचा क्रिकेटला राम राम!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारताचा कसोटी क्रिकेट मधील अपराजित कर्णधार व अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेने गुरुवारी (३० जुलै) क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती जाहीर केली. निवृत्तीची घोषणा करताना रहाणे भावूक झाला. ३८ वर्षीय रहाणे म्हणाला की, आयुष्यातील प्रत्येक सुरुवातीचा शेवट असतो आणि आता पुढे जाण्याची हीच योग्य वेळ आहे असे त्याला वाटते. आपल्या कारकिर्दीतील चढ-उतारांची आठवण करून देताना तो म्हणाला की, त्याला मैदानावर अनेक पराभव पत्करावे लागले आणि अनेक चुकाही कराव्या लागल्या, पण त्याने क्रिकेट चाहत्यांच्या हृदयातले आपले स्थान कधीच गमावले नाही.

अजिंक्य रहाणेच्या मते, जीवनातील सर्वात मोठे सत्य हे आहे की प्रत्येक सुरुवातीचा शेवट असतो आणि जेव्हा ती वेळ येते, तेव्हा ते स्वीकारून पुढे जायला हवे. तो म्हणाला, "जीवनाचे सत्य हे आहे की प्रत्येक सुरुवातीचा शेवट असतो. जेव्हा ती वेळ येते, तेव्हा त्याचा आदर करून पुढे जायला हवे. फलंदाजीमध्ये, मी नेहमीच योग्य वेळेवर विश्वास ठेवला आहे आणि त्याचे महत्त्व जाणले आहे. आज मला वाटते की आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्त होण्याची हीच योग्य वेळ आहे."

"मी या खेळाला माझे सर्वस्व दिले"

अजिंक्य रहाणे म्हणाला, "लहानपणी सरावासाठी डोंबिवलीहून प्रवास करण्याच्या त्या सुरुवातीच्या दिवसांपासून ते आजपर्यंत, मी या खेळाला माझे सर्वस्व दिले आहे. प्रत्येक दिवस, प्रत्येक डाव आणि फलंदाजीची प्रत्येक संधी ही माज्यासाठी भारतीय संघाची कॅप घालण्याचे माझे स्वप्न जगण्याचा एक मार्ग होता. मी नेहमी एका नियमाचे पालन केलेः माझ्या देशाला आणि माज्या संघाला स्वतःपेक्षा जास्त महत्त्व दिले."

आपल्या संदेशात, अजिंक्य रहाणे म्हणाला की तो पूर्ण प्रामाणिकपणे क्रिकेट खेळला आणि त्याचा नेहमी विश्वास होता की जर तुमचे हेतू योग्य असतील, तर खेळ तुम्हाला नक्कीच साथ देईल. तो म्हणाला, "मी हा खेळ पूर्ण प्रामाणिकपणे खेळलो आहे. माझा नेहमीच विश्वास राहिला आहे की, जर तुमचे हेतू योग्य असतील, तर क्रिकेट तुमची नक्कीच काळजी घेईल. मी प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून भारतीय क्रिकेटने प्रचंड प्रगती केली आहे. गेल्या २० वर्षांपासून या प्रवासाचा एक भाग असल्याचा मला अभिमान आहे."



अजिंक्य रहाणेने हे स्पष्ट केले की, एक भारतीय क्रिकेटपटू म्हणून त्याचा अध्याय जरी संपला असला तरी, क्रिकेटसोबतचे त्याचे नाते कधीही संपणार नाही. रहाणे म्हणाला, "एक भारतीय क्रिकेटपटू म्हणून माझा प्रवास कदाचित संपत आला असेल, पण क्रिकेटसोबतचा माझा प्रवास सुरूच राहील." मला पुढच्या पिढीला मदत करायची आहे, या खेळातून शिकलेली मूल्ये त्यांच्यासोबत वाटून घ्यायची आहेत आणि क्रिकेटने मला जे काही दिले आहे, त्याची कोणत्यातरी प्रकारे परतफेड करायची आहे."

आपल्या निरोपाच्या संदेशात, अजिंक्य रहाणेने भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय), मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए), त्याचे सर्व सहकारी खेळाडू, प्रशिक्षक, इंडियन प्रीमियर लीगच्या सर्व फ्रँचायझी, त्याची पत्नी राधिका, कुटुंब, मित्र आणि त्याच्या क्रिकेट प्रवासात त्याला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाचे आभार मानले.

तो म्हणाला, "बीसीसीआय, मुंबई क्रिकेट असोसिएशन, माझे सर्व सहकारी खेळाडू, प्रशिक्षक, सर्व आयपीएल संघ, माझी पत्नी राधिका, माझे संपूर्ण कुटुंब, मित्र आणि सुख-दुःखात माज्या पाठीशी उभ्या राहिलेल्या प्रत्येकाचे आभार." माझे सर्वात मोठे आभार त्या क्रिकेट चाहत्यांचे आहेत ज्यांनी नेहमी माज्यावर विश्वास ठेवला आणि मला पाठिंबा दिला."

**रहाणेने 'अजिंक्य' नावाचा अर्थ स्पष्ट केला**

आपल्या संदेशाच्या शेवटी, अजिंक्य रहाणेने एक अत्यंत भावनिक विधान केले. तो म्हणाला की त्याच्या नावाचा अर्थ 'अजेय' आहे, पण क्रिकेटने त्याला अनेक वेळा पराभवाला सामोरे जायला शिकवले आहे.

तो म्हणाला, "माझ्या नावाचा अर्थ 'अजेय' आहे, पण क्रिकेटने मला अनेक वेळा पराभवही दाखवला आहे. एक क्रिकेटपटू म्हणून, आपल्याला यशापेक्षा जास्त अपयशांना सामोरे जावे लागते. माज्या संघाने सामने गमावले आणि माज्याकडून चुका झाल्या. पण एक जागा अशी होती जिथे मी कधीच हारलो नाहीः तुमची मने. तुमच्या प्रेमाबद्दल, विश्वासाबद्दल आणि पाठिंब्याबद्दल मनःपूर्वक आभार. कॅप क्रमांक २७८, आपण इथेच थांबूया."

अजिंक्य रहाणेचे आंतरराष्ट्रीय क्रिकेट करिअर अत्यंत यशस्वी राहिले असून, त्याने कसोटी (टेस्ट), एकदिवसीय (वनडे) आणि टी-२० या तिन्ही फॉरमॅटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. जुलै २०२३ मध्ये त्याने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता.

**आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची आकडेवारी**

एकूण सामनेः १९५ सामने (२५१ डावांमध्ये एकूण ८,४१४ धावा, सरासरी ३५.९५)

एकूण शतके/अर्धशतकेः १५ शतके आणि ५१ अर्धशतके (सर्व फॉरमॅट मिळून)

कसोटी क्रिकेट (टेस्ट): ८५ सामन्यांत ५,०७७ धावा, सरासरी ३८.४६, १२ शतके, सर्वोच्च धावसंख्या १८८.

एकदिवसीय क्रिकेट (वनडे): ९० सामन्यांत २,९६२ धावा, सरासरी ३५.२६, ३ शतके, सर्वोच्च धावसंख्या १११.

टी-२० आंतरराष्ट्रीयः २० सामन्यांत ३७५ धावा, सरासरी २०.८३.

**कारकिर्दीतील ठळक वैशिष्ट्ये**

पदार्पणः अजिंक्य रहाणेने ऑगस्ट २०११ मध्ये इंग्लंडविरुद्ध टी-२० सामन्यातून आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते. मार्च २०१३ मध्ये त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी पदार्पण केले.

ऐतिहासिक कप्तानीः २०२०-२१ मधील ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारताचा नियमित कर्णधार - खेळाडू उपलब्ध नसताना, त्याने अत्यंत कठीण परिस्थितीत संघाचे यशस्वी नेतृत्व केले आणि ऐतिहासिक बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिका २-१ ने जिंकवून दिली.

अजिंक्य कर्णधार : अजिंक्यने नेतृत्व केलेल्या सातपैकी सहा कसोटी सामन्यात विजय मिळाला तर एक सामना न्युझीलंड विरुद्ध शेवटचा बळी न मिळाल्याने अनिर्णित राहिला. म्हणजे त्याच्या नावाप्रमाणेच तो कसोटी क्रिकेटमधील अपराजित भारतीय कर्णधार ठरला. भारताच्या या हरहुन्नरी खेळाडूस त्याच्या सुवर्णमय कारकिदीसाठी खराखुरा सलाम तसेच भावी कारकिर्दीस हार्दिक शुभेच्छा !!!

– ९०९६३७२०८२

# कोण होते, दामोदर धर्मानंद कोसंबी...

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

दामोदर धर्मानंद कोसंबी हे एक जागतिक प्रतिष्ठा प्राप्त केलेले गणित आणि सांख्यिकी विषयातले तज्ज्ञ होते. त्याचबरोबर एक इतिहासतज्ज्ञ, प्राच्य भारत शास्त्राचे-इंडॉलॉजीचे व संस्कृतचे गाढे अभ्यासक म्हणूनही त्यांना मान्यता लाभली होती. मार्क्सवादी विचारवंत आणि डाव्या चळवळीतील एक क्रियाशील नेते म्हणूनही त्यांचे नाव घ्यावे लागेल. शेवटपर्यंत त्यांचे बहुविध संशोधनकार्य अखंड चालू होते. विशुद्ध गणित, सांख्यिकी, नाणकशास्त्र, अनुवंशशास्त्र, प्राचीन संस्कृत ग्रंथ, इतिहास, प्राचीन भारतशास्त्र, इतक्या विविध विषयांत मूलभूत संशोधन करणारा दुसरा कोणताही संशोधक साऱ्या जगाच्या इतिहासात झालेला नाही.

दामोदर कोसंबींचा पहिला संशोधनपर लेख भौतिक शास्त्रातला होता. त्यानंतर ते गणितावरचे संशोधन करू लागले. अलिगड विद्यापीठात असताना दोन वर्षांत त्यांचे आठ संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले. गणितामधील संशोधनाचे त्यांचे काम आयुष्यभर चालूच होते. टेन्सॉर ॲनॅलिसिस व पाथ जॉमेट्री या गणिताच्या दोन शाखांमध्ये त्यांचे काम होते. आयुष्यभरात त्यांनी गणितावर एकूण ४८ संशोधनपर लेख लिहिले. पण गणिताची उपयोजित शाखा म्हणून त्यांना सांख्यिकीचे आकर्षण वाटू लागले. सांख्यिकीचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी प्राचीन नाण्यांचा एक सांख्यिकी प्रश्न निवडला. नाणी जितका काळ हाताळली जातात, त्या प्रमाणात त्यांचे वजन कमी होते. त्यामुळे प्राचीन नाण्यांचा अभ्यास करून, त्या राजवटींचा काळ निश्चित करता येतो. हा अभ्यास करून त्यांनी नाणकशास्त्र या शास्त्राचा पाया घातला.

नाणकशास्त्राच्या अभ्यासातून नाण्याचा काळ ठरवता येऊ लागला. पण त्या वेळेला कोणत्या राजांच्या राजवटी होत्या, हे नेमके कळत नव्हते. यातून कोसंबी प्राचीन भारताच्या इतिहासाच्या प्रांतात शिरले. राजवटींचा नेमका शोध घेण्यासाठी ते संस्कृत शिकले; पण संस्कृत ग्रंथांच्या अनेक आवृत्त्या मिळत होत्या व त्यात पाठभेद होते. मग कोसंबींनी संस्कृत ग्रंथांच्या चिकित्सक आवृत्त्या बनवण्याचे काम केले. भर्तृहरीच्या काव्यावरचे त्यांचे काम आदर्श मानले जाते. विस्मृतीच्या गर्तेत गेलेल्या निदान ५० संस्कृत कवींचे काम त्यांनी उजेडात आणले. या अभ्यासातून कोसंबींना जाणवले, की संस्कृत कवींच्या रचना आणि प्रत्यक्ष समाज यांचा काहीच संबंध नव्हता, म्हणून त्या वेळच्या समाजाची व्यवस्था जाणून घेण्यासाठी त्यांनी काम सुरू केले. म्हणजेच ते इंडॉलॉजीच्या क्षेत्रात आले. अनागरी क्षेत्रातील, संस्कृतीच्या परिघावर असणाऱ्या समाज-घटकांमधील लोककथा, चालीरीती आणि मिथके यांचा त्यांनी अभ्यास केला व त्यांतून अब्राह्मणी अशा भारताच्या लोकसंस्कृतीचा वेध घेतला. प्राचीन भारताच्या अभ्यासाची हीच कोसंबींची प्रसिद्ध मार्क्सवादी पद्धत होय.

याशिवाय सामाजिक प्रश्नांवरही कोसंबींनी विपुल लेखन केले. अण्वस्त्रांच्या विरोधात साम्यवादी मंडळींनी सन १९५० सालाच्या सुमारास जागतिक शांतता चळवळ सुरू केली, त्यात कोसंबी सक्रिय होते. अण्वस्त्रांच्या व पर्यायाने अणुऊर्जेच्या विरोधात आणि सौरऊर्जेचा पुरस्कार करणारे लेखही त्यांनी लिहिले आहेत. सांख्यिकीचा वापर करून त्यांनी गुणसूत्रांच्या संदर्भात कोसंबी फॉम्युर्ला शोधला, ज्याचा आजही अभ्यास केला जातो.

दामोदर कोसंबी यांचा जन्म दि.३१ जुलै १९०७ रोजी गोव्यातील कोसबेन या गावी झाला. त्यांचे वडील धमार्नंद कोसंबी हे संस्कृतचे, पाली भाषेचे आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचे गाढे विद्वान होते. अत्यंत खडतर परिस्थितीशी झुंजून धमार्नंदांनी या विषयाचे शिक्षण प्राप्त केले होते व या विषयातील त्यांचा अधिकार भारतात आणि युरोप-अमेरिकेतही मान्यता पावला होता. विद्वान आणि संशोधनाची नेमकी शिस्त असणाऱ्या पित्याच्या सहवासात मोठे झाल्याचा फार मोठा फायदा दामोदरांना झाला. अभ्यासाची व संशोधनाची पद्धत त्यांना लहानपणापासूनच बघता आली, शिकता आली. पाली भाषेतील ग्रंथाचे संशोधन करण्यासाठी धमार्नंदांना अमेरिकेत हॉर्वर्ड विद्यापीठात निमंत्रण आले. त्या वेळी अकरा वर्षांच्या असलेल्या दामोदरांना ते बरोबर घेऊन गेले. मग दामोदरने तिथल्या प्राथमिक शाळेत शिक्षण घ्यायला सुरुवात केली व नंतर तिथल्या केंब्रिज हाय ॲण्ड लॅटिन स्कूल या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत प्रवेश घेतला.

चार वर्षांनंतर धर्मानंद भारतात परतले, ते दामोदरांना अमेरिकेत ठेवूनच! मग त्यांनी अमेरिकेतच हॉर्वर्ड विद्यापीठात गणित विषयाचे पदवीपर्यंत शिक्षण घेतले. प्रा.जॉर्ज बरकॉफ हे त्यांचे गणितातले गुरू होते. गणित या विषयाने त्यांना झपाटून टाकले होतेच; पण त्याच्या जोडीलाच त्याने इतिहास, समाजशास्त्र, अनेक भाषा यांचाही अभ्यास केला. विद्यापीठातील प्रसिद्ध ग्रंथालयाचा पुरेपूर लाभ घेतला. कोणत्याही विषयाचा अभ्यास मुळापासून करण्याची शिस्त अंगी बाणवून घेतली. वयाची ११ ते २१ अशी अत्यंत महत्त्वाची वर्षे त्यांनी अमेरिकेत काढली व तिथले संस्कार आणि शिक्षणासोबत सन १९२९ साली ते गणिततली पदवी घेऊन भारतात परतले. त्यांना पदवी परीक्षेत अतिशय उत्तम यश मिळाले. पण त्याच वेळेला अमेरिकेत मंदीची लाट आली असल्यामुळे त्यांना अमेरिकेत राहून उच्चशिक्षण घेणे अथवा गणितातले संशोधन करणे शक्य झाले नाही. त्यांना भारतात परतावे लागले. याचा परिणाम म्हणून की काय? त्यांच्या स्वभावात कडवटपणाची छटा आली. भारतात आल्यावर प्रथम ते बनारस हिंदू विद्यापीठात गणिताचे अध्यापन करू लागले. नंतर ते अलिगड मुस्लीम विद्यापीठात गेले. पण दोनअडीच वर्षांतच ते पुण्याला आले व फर्ग्युसन महाविद्यालयात विद्यार्थ्यांना गणित शिकवू लागले.

– ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# नागपूरमध्ये उभारण्यात येणारे जागतिक दर्जाचे कन्व्हेन्शन सेंटर

## २०२९ पर्यंत कार्यान्वित करण्याचे नियोजन करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील परिषद, प्रदर्शन व व्यावसायिक कार्यक्रमांचे केंद्र विकसित करण्यासाठी जागतिक दर्जाचे बहुउद्देशीय कन्व्हेन्शन व एक्झिबिशन सेंटर उभारण्यात येणार आहे. हा प्रकल्प नागपूरच्या आर्थिक विकासाला, पर्यटनाला, उद्योगांना आणि रोजगार निर्मितीला मोठी चालना देणारा ठरणार असून २०२९ पर्यंत हा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे नागपूर कन्व्हेंन्शन सेंटरसंदर्भात सादरीकरण बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी परदेशी, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपीन इटनकर, दूरदृश्य प्रणालीद्वारे फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नागपूर विमानतळ परिसरातील नागरी विकासाच्या नियोजनाशी सुसंगत असा हा प्रकल्प विकसित करण्यात येणार आहे. विमानतळ, रस्ते आणि रेल्वे कनेक्टिव्हिटीचा विचार करून याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. नागपूरमध्ये मोठ्या क्षमतेच्या कन्व्हेन्शन सेंटरची आवश्यकता असून, या केंद्रामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद, प्रदर्शन, कॉर्पोरेट कार्यक्रम आणि व्यावसायिक उपक्रम आयोजित करता येणार आहेत.

कन्व्हेन्शन सेंटर केवळ परिषद, प्रदर्शन आणि व्यावसायिक कार्यक्रमांचे केंद्र न राहता ते नागपूरच्या ओळखीचे सांस्कृतिक केंद्र ठरावे. यासाठी वास्तुरचना अत्यंत आकर्षक, आधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण आणि पर्यावरणपूरक असावी. आधुनिक वास्तुशैलीसोबतच ऊर्जा बचत, हरित तंत्रज्ञान आणि पर्यावरण संवर्धनाच्या संकल्पनांचा वापर करावा अशा सूचना त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.

या प्रकल्पाच्या माध्यमातून हॉस्पिटॅलिटी, मीडिया, इव्हेंट मॅनेजमेंट, पर्यटन तसेच संबंधित सेवा क्षेत्रांसाठी कुशल मनुष्यबळ घडविणारे केंद्र म्हणून विकसित करण्यात यावे. नागपूरला जागतिक दर्जाचे परिषद, प्रदर्शन, पर्यटन आणि उद्योग केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. या प्रकल्पाशी संबंधित सर्व प्रक्रिया, निविदा, जमीन हस्तांतरण, बांधकाम आणि इतर आवश्यक कामे कालमर्यादेत पूर्ण करून प्रकल्प नियोजित वेळेत कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवावे व त्यानुसार नियोजन करावे असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

# पुस्तक प्रकाशन सोहळ्यात संतवाङ्मयाच्या आध्यात्मिक परंपरेचा गौरव

## मुक्तेश्वर आश्रमात संपूर्ण उपासना व भजन पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सोमलवाडा येथील श्रीसंत पाचलेगावकर महाराज मुक्तेश्वर आश्रमात प.पू. बाबा महाराज यांनी रचलेल्या दिव्य भजनांचा, संपूर्ण उपासना व भजन संहितेचा समावेश असलेल्या 'संपूर्ण उपासना व भजन' या आकर्षक पुस्तकाचे प्रकाशन भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाले. संतवाङ्मयाची अमूल्य परंपरा जपणाऱ्या या प्रकाशन सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून प्रकाश एदलाबादकर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मुक्तेश्वर आश्रमाचे अध्यक्ष समीर खरे होते. विशेष अतिथी म्हणून नितीन तापस व अशोक तापस उपस्थित होते. राम गर्गे यांनी मार्गदर्शन केले, तर कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन रेणुका करंदीकर यांनी केले.

मार्गदर्शन करतांना प्रकाश एदलाबादकर यांनी सांगितले की, संतवाङ्मय हे समाजाला आध्यात्मिक मूल्यांशी जोडणारे प्रभावी माध्यम आहे.

संतांनी रचलेले अभंग, गाथा, मनाचे श्लोक आणि इतर साहित्य हे केवळ भक्तीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी मार्गदर्शक ठरले आहे. या पुस्तकातील उपासना आणि भजने साधकांना आत्मशोध, आत्मजागृती आणि ईश्वरभक्तीचा सुंदर अनुभव देणारी असून त्यामधून आध्यात्मिक ऊर्जा व चैतन्याची अनुभूती मिळते, असे त्यांनी नमूद केले. आजच्या धकाधकीच्या जीवनात अध्यात्माची चेतना जागृत करण्यासाठी, साधनेची प्रेरणा देण्यासाठी आणि प्रत्येक साधकाला योग्य दिशा दाखविण्यासाठी हे पुस्तक प्रभावी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रकाशन सोहळ्यास आश्रमाचे पदाधिकारी, भाविक आणि भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत पुस्तक आध्यात्मिक साधनेसह समाज प्रबोधनासाठीही महत्त्वपूर्ण ठरेल, अशी भावना व्यक्त केली.

गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त केदार 'गणेशसुत' अभ्यंकर यांच्या 'तुला पाहताना' या भक्तिगीताचेही सादरीकरण करण्यात आले. गौरी सोमलवार, दीप्ती मुंजे, हृदया बडे, प्रचिती सहस्त्रबुद्धे, डॉ. अरुणा जगताप, भालचंद्र साठे, सतीश बल्लाळ यांनी गीत सादर केले. गोविंद गडीकर व विवेक लोहकरे यांनी साथसंगत केली, तर आभार अमित गोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सचिव श्याम पोहनकर, विवेक प्रतापे, शशिकांत वाघमारे, शार्दूल महावादीवार, अमन लुंबा यांच्यासह अनेकांनी सहकार्य केले.

# टीईटी, एमपीएससी व एमएच-सीईटी परीक्षांतील कथित अनियमिततेची पारदर्शक चौकशी करा, विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

टीईटी, एमपीएससी तसेच अलीकडे पार पडलेल्या एमएच- सीईटी परीक्षांबाबत विविध स्तरांवर उपस्थित झालेल्या कथित अनियमितता आणि विद्यार्थ्यांकडून व्यक्त करण्यात आलेल्या शंकांमुळे राज्यातील विद्यार्थी व पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या सर्व प्रकरणांची निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळेत चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी नागपूर येथील CJP चे समन्वयक, प्रा.सचिन काळबांडे यांनी केली आहे. लाखो विद्यार्थी अनेक वर्षांच्या कठोर परिश्रमांनंतर या स्पर्धा परीक्षा देत असल्याने परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास कायम राखणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारीची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या हिताचे संपूर्ण संरक्षण करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. परीक्षा व्यवस्थेत अधिक पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि तांत्रिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी शासनाने आवश्यक सुधारणा तातडीने राबवाव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नसून, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने सातत्याने आवाज उठविण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे इको क्लबमधील सर्व विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त इको क्लब उपक्रमांतर्गत इको क्लब मधील सर्व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. इको क्लब मधील सर्व सदस्य यांनी विविध प्रकारचे वृक्ष झाडांचे वृक्षारोपण केले. सुरुवातीला मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी स्कॉलरशिपच्या परीक्षेत पात्र झालेल्या वर्ग ७ व्या वगार्तील पात्र १५ विद्यार्थी यांचे अभिनंदन केले. तसेच वर्ग ४ थ्या वर्गातील १ विद्याथीर्नी स्कॉलरशिपच्या परीक्षेत पात्र झाली आहे.मिळेलेले यश




विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे फळ तसेच सर्व शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाचे फळ निश्चित स्वरूपात मिळाले.

डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथी निमित्त सुरुवातीला विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी आपल्या जिवनात सामान्य परिस्थितीतुन भारताच्या राष्ट्रपतीपर्यंत कसा जीवनाचा प्रवास केला याबद्दल मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गट ग्रामपंचायत दहेगाव सरपंच भारती आंबीलढुके,प्रमुख पाहुणे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे उपस्थित होते.

डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रावर विद्यार्थ्यांनी भाषण दिले. आजच्या या डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त इको क्लब अंतर्गत राजेश रोहाड यांच्या विशेष सहकायार्ने शाळेच्या परिसरात विविध ठिकाणी वृक्षारोपण केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकवृंद सुधीर खंडाईत, राजेश रोहाड,सुधीर कांबळे, सुजाता बोदेले, प्रज्ञा रामटेके, संगीता कारेमोरे, पुष्पलता उके, उमेश उके, कैलास फटिंग, रामदास अहिरकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिक्षक राजेश रोहाड यांनी केले.

# विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमले एस. आर. के. इंडो पब्लिक स्कूल!

## आषाढी एकादशीनिमित्त दिंडी, संत गोरा कुंभार नाटिका, अभंग-नृत्याविष्कारातून विद्यार्थ्यांनी जपली वारकरी परंपरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त जलालखेडा येथील एस. आर. के. इंडो पब्लिक स्कूलमध्ये वारकरी संप्रदायाची परंपरा, भारतीय संस्कृती आणि संत विचारांचे दर्शन घडविणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या अखंड जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात संपूर्ण शाळा परिसर अक्षरशः पंढरीमय झाला होता.



कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन आणि अभंग गायनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून आकर्षक दिंडी काढली. "ज्ञानोबा-तुकाराम", "पांडुरंग हरी" अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. दिंडीत सहभागी विद्यार्थ्यांच्या हातात भगवे पताके, टाळ, चिपळ्या आणि तुळशीची रोपे असल्याने वारकरी परंपरेचे जिवंत चित्र उभे राहिले.

यावेळी विद्यार्थ्यांनी संत गोरा कुंभार यांच्या जीवनावर आधारित हृदयस्पर्शी नाटिका सादर करून भक्ती, प्रामाणिकपणा, श्रमप्रतिष्ठा आणि समतेचा संदेश दिला. भगवान विठ्ठल व माता रुक्मिणी यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भक्तिमय नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. अभंग, हरिपाठ आणि संतवाणीच्या सादरीकरणामुळे वातावरण अधिकच भक्तिरसात न्हाऊन निघाले.

कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत गोरा कुंभार यांसारख्या संतांच्या विचारांची ओळख करून देण्यात आली. भारतीय संस्कृती, सामाजिक समता, पर्यावरण संवर्धन, राष्ट्रप्रेम, नैतिक मूल्ये आणि संस्कारांचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक मूल्यांची जोपासना करण्याच्या शाळेच्या उपक्रमाचे पालकांनीही कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि संघभावना विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

कार्यक्रमाला शाळेच्या प्राचार्या शुभांगी अर्डक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले.

**संस्कार, संस्कृती आणि शिक्षणाचा सुंदर संगम**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत भारतीय संस्कृती, संतपरंपरा आणि नैतिक मूल्यांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. आषाढी एकादशीसारखे सांस्कृतिक उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, शिस्त, एकता, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्राभिमानाची भावना दृढ करतात. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगण्याची प्रेरणा मिळते आणि संस्कारक्षम पिढी घडविण्यास हातभार लागतो.

### थोडक्यात

## अतिवृष्टीग्रस्तांना प्रत्येकी ५० हजारांची मदत द्या; अन्यथा तहसील कार्यालयाला टाळे ठोकू : आक्रमण युवक संघटना



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहर व नागपूर ग्रामीण भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना शासनाने तातडीने सर्वेक्षण करून प्रत्येक कुटुंबाला ५० हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आक्रमण युवक संघटनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात तहसीलदार खंडारे यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अतिवृष्टीमुळे सावनेर, कुही, उमरेड, कामठी, कन्हान तसेच नागपूर शहरातील बिनाकी ले आऊट, जरीपटका, वैशाली नगर, वर्धमान नगर, नरेंद्र नगर, त्रिमूर्ती चौक, इमामवाडा आदी परिसरांमध्ये पावसाचे पाणी घरांमध्ये शिरल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. घरगुती साहित्य, इलेक्ट्रॉनिक वस्तू, विद्यार्थ्यांची पाठ्यपुस्तके व इतर जीवनावश्यक वस्तूंची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आक्रमण संघटनेने केली आहे.

तसेच ही मदत लवकरात लवकर जाहीर न झाल्यास तहसीलदार कार्यालयाला घेराव घालून कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल, असा इशाराही आक्रमण युवक संघटनेने दिला. यावेळी जिल्हा संयोजक ओपूल तामगाडगे, जिल्हाध्यक्ष विशाल बनसोड, जिल्हा महासचिव सूरज पुराणिक, शहर सचिव अजय गायकवाड, विक्की वानखेडे, अविष्कार कांबळे, पंकज नाखले, जुगनू डांगरे, राजू मेश्राम तसेच संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## गुरुपौर्णिमेनिमित्त श्रद्धा फाउंडेशनतर्फे प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गुरुपौर्णिमेच्या पावन निमित्ताने श्रद्धा फाउंडेशन तर्फे जूनी शुक्रवारी, नागपूर येथे प्रेरणादायी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये गुरुंबद्दल आदर, संस्कार आणि शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती यांच्या पूजनाने व सरस्वती वंदनेने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व, गुरुंचे जीवनातील स्थान तसेच त्यांच्याप्रती आदर, श्रद्धा आणि कर्तव्यभाव याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. श्रद्धा फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रद्धा जैन यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "गुरु हे जीवनाला योग्य दिशा देणारे खरे मार्गदर्शक असतात. त्यांच्या ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शनामुळेच व्यक्तिमत्त्व घडते आणि यशस्वी आयुष्याची पायाभरणी होते." कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेसह विविध सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या संयोजिका भावना जैन तसेच संयोजक ऋषभ जैन आणि ईशांत जैन यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, शिस्तबद्ध जीवनशैली आणि गुरुजनांप्रती आदरभाव कायम ठेवण्याचा संदेश दिला. यावेळी फाउंडेशनचे कार्यकर्ते हर्षद जमोदकर व नंदन जैस उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी उपस्थितांनी गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरी केली.

## दत्तवाडीतील इंदिरा गांधी शाळेत पेपर बॅग निर्मिती उपक्रम उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त भारत आणि 'Reduce, Reuse, Recycle' या संकल्पनेचा प्रसार करण्याच्या उद्देशाने दत्तवाडी येथील इंदिरा गांधी लोअर इंग्लिश स्कूल मध्ये विद्यार्थ्यांसाठी पेपर बॅग निर्मिती उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी जुन्या वर्तमानपत्रांचा वापर करून आकर्षक व उपयुक्त कागदी पिशव्या तयार करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमात विद्यार्थ्यांना प्लास्टिक पिशव्यांमुळे होणारे पर्यावरणीय दुष्परिणाम तसेच कागदी पिशव्यांच्या वापराचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला. हा उपक्रम वाडी नगर परिषद व गोदरेज फिडबॅक फांडडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. वाडी नगर परिषदेचे मुख्याधिकारी विनोद जाधव यांचे मार्गदर्शन, शाळेच्या मुख्याध्यापिका आशा गिरडकर यांचे सहकार्य तसेच गोदरेज फिडबॅक फॉंडेशनचे प्रोजेक्ट मॅनेजर आदर्श तंवर आणि टीम लीडर पिंकी पाटील यांच्या नियोजनामुळे उपक्रम यशस्वी झाला. पर्यावरण संवर्धनासह विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना रुजविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# ज्येष्ठ नागरिकांच्या अर्जांवर ९० दिवसांत निर्णय बंधनकारक!

**निष्काळजी अधिकाऱ्यांवर होणार कारवाई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय, महसूल विभागाकडून सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना कडक अंमलबजावणीचे आदेश, मार्गदर्शक सूचना जारी**

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणासाठीच्या प्रकरणांचा कायद्यानुसार ९० दिवसांच्या आत निपटारा होणे बंधनकारक असून, यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई सहन केली जाणार नाही असा इशारा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

राज्यात बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढत असून, अनेक ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मुलांकडून दुर्लक्ष, आर्थिक उपेक्षा आणि छळाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय उपचार यांसारख्या मूलभूत गरजांपासून अनेक ज्येष्ठ नागरिक वंचित राहत असल्याच्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत. अशा प्रकरणांचा वेळेत निपटारा व्हावा आणि ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने जगता यावे, यासाठी शासनाने ही कठोर पावले उचलली आहेत.

"आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७" अंतर्गत उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली 'ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरण' कार्यरत आहे. मात्र, निवडणूक, कायदा-सुव्यवस्था आणि जमीन महसुलाच्या कामाच्या ताणामुळे या तक्रारींवर वेळेत सुनावणी होत नसल्याची बाब 'महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ' (फेस्कॉम) यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. महिने न महिने तक्रार अर्ज प्रलंबित राहणे ही गंभीर बाब असल्याचे सांगत,



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूल विभागाने सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

**महसूल विभागाच्या प्रमुख मार्गदर्शक सूचना, तात्काळ नोंदणी व पोहोच पावती**
ज्येष्ठ नागरिकांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी सादर केलेल्या अर्जाची त्याच दिवशी स्वतंत्र नोंदवहीत नोंदणी करून अर्जदाराला तातडीने पोहोच पावती देणे अनिवार्य आहे.

**कमाल ९० दिवसांत निकाल**
कायदा व नियमांनुसार अर्ज दाखल झाल्यापासून कमाल ९० दिवसांच्या आत अंतिम आदेश पारित करणे बंधनकारक करण्यात आले असून विनाकारण सुनावणीच्या तारखा पुढे ढकलण्यास मनाई करण्यात आली आहे.

**समुपदेशनाला प्राधान्य**
कौटुंबिक सलोखा टिकून राहण्यासाठी सुनावणीच्या पहिल्या टप्प्यात सामोपचाराने व समुपदेशनाने प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल.

**भत्त्याची वसुली व पोलीस मदत**
न्यायाधिकरणाने किंवा अपिलीय प्राधिकरणाने मंजूर केलेल्या चरितार्थ भत्त्याची रक्कम मुलांकडून किंवा नातेवाईकांकडून वेळेत वसूल होत आहे की नाही, याची शहानिशा पोलिसांच्या मदतीने केली जाईल.

**विभागीय आयुक्तांचा मासिक आढावा**
सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या क्षेत्रातील जिल्हाधिकाऱ्यांच्या मासिक बैठकीत या कायद्यांतर्गत दाखल, निकाली व प्रलंबित प्रकरणांचा विशेष आढावा घ्यावा.

**ज्येष्ठ नागरिक मदत कक्ष**
प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात 'ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष' कार्यान्वित करून प्राप्त तक्रारींचे योग्य ट्रॅकिंग करण्याचे आदेश दिले आहेत.

या निर्णयावर बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, "बदलत्या कौटुंबिक रचनेमुळे वृद्ध आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होण्याच्या व त्यांच्यावर अन्याय होण्याच्या घटना चिंताजनक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आम्ही महसूल प्रशासनाला कडक निर्देश दिले आहेत.

ज्येष्ठ नागरिकांचे उर्वरित आयुष्य सुखाचे आणि सन्मानाचे जावे, हाच आमचा मूळ उद्देश आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामाची नोंद घेतली जाईल. मात्र, कामात कसूर करणाऱ्या किंवा ज्येष्ठ नागरिकांचे अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची तसेच दंडात्मक कारवाई केली जाईल."

---

थोडक्यात

## ज्येष्ठ उद्योजिका सरोज चौरसिया यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
घाट रोड परिसरातील ज्येष्ठ उद्योजिका श्रीमती सरोज ओमशंकर चौरसिया (वय ८०) यांचे गुरुवारी, ३० जुलै रोजी वृद्धापकाळाने



निधन झाले. त्यांच्या निधनाने चौरसिया परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून व्यापारी व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी मोक्षधाम घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पुत्र निलेश चौरसिया व शैलेश चौरसिया तसेच परिवारातील सदस्य असा मोठा परिवार आहे. चौरसिया परिवाराचा श्री नारायण स्टील अँड इंडस्ट्रीज, श्री नारायण इंडस्ट्रीज आणि श्री गौरी इंडस्ट्रीज, घाट रोड, नागपूर या उद्योगांशी निकटचा संबंध असून, त्यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

## महादुला येथे गोतस्करांकडून गायीची चोरी; कारने पलायन, स्थानिकांमध्ये संताप

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**
कोराडी पोलीस स्टेशन अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मधील महादुला येथे काल (रात्री) सुमारे १:३० वाजता गोतस्करांनी कारमधून येऊन गायीची चोरी केल्याची घटना समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, महादुला येथील शरद काळे यांच्या घरातील एक गाय चोरीला गेली असून, याशिवाय परिसरातील आणखी दोन नागरिकांचेही पशुधन चोरीला गेल्याची माहिती पुढे येत आहे. गोतस्करांच्या कारला अडवण्यासाठी काही स्थानिक तरुणांनी कारवर दगडफेक करून त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपींनी भरधाव कार पळवत असताना समोर आलेल्या एका गाईला धडक दिली आणि ते घटनास्थळावरून पसार झाले.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कोराडी पोलिसांच्या गस्तीचा गोतस्करांवर कोणताही प्रभाव पडत नसल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षीदेखील शरद काळे यांच्या घरातील गाय चोरीला गेल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणात केवळ एफआयआर नोंदविण्यापलीकडे कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. तसेच, महादुला परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा प्रभावी नसल्यामुळे अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यात अडचणी येत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे गोतस्करांविरुद्ध कठोर कारवाई करून त्यांच्यावर तातडीने आळा घालण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## गुरुपौर्णिमा म्हणजे गुरूंप्रति कृतज्ञता व्यक्त करणारा क्षण : प्राचार्य यु.आर.सोनेवाने



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**
गुरुपौर्णिमा म्हणजे सण नव्हे तर गुरूंप्रति कृतज्ञता हा दिवस केवळ पूजनाचा किंवा उत्सव साजरा करण्याचा नाही,तर जीवनात दिशा दाखवणाऱ्या,अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणाऱ्या गुरूंच्या ऋणांची जाणीव करून देणारा दिवस. भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान अत्युच्च मानले गेले असून "गुरु ब्रह्मा,गुरु विष्णू,गुरु देवो महेश्वर" या मंत्रातूनही हे अधोरेखित होते.गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने विद्यार्थी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करतात त्यांच्या चरणी आदरांजली अर्पण करतात आणि त्यांच्या शिकवणुकीतून जीवनमूल्य आत्मसात करण्याचा संकल्प करतात. आजच्या स्पर्धात्मक युगातही गुरूंचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्तव ठरते,म्हणूनच हा दिवस एक पवित्र संस्कार पर्व म्हणून साजरा केला जातो.असे प्रतिपादन प्राचार्य यु.आर.सोनेवाने यांनी व्यक्त केले. ते पंचशील हायस्कूल,विज्ञान व कला कनिष्ठ महाविद्यालय मक्काटोला येथे, गुरुपौर्णिमा व्यासपूजा निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक टी.के.चौधरी व एम.एल.कुरसुंगे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी गीत गायन व मनोगत सादर करून गुरुप्रति कृतज्ञता व्यक्त केली. प्रमुख अतिथिनी गुरु शिष्य परंपरेतील प्रेरणादायी कथा सांगत विद्यार्थ्यांना जीवनातील नैतिक मूल्यांची शिकवण दिली. कार्यक्रमाचे संचालन उच्च माध्यमिक शिक्षक व्ही.डी.सुलकिया यांनी केले. व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## २५-३० वर्षांपूर्वी बांधलेले प्रवासी प्रतीक्षालय जीर्णावस्थेत; प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- प्रकाश टेंभरे**
तालुक्यातील अनेक ठिकाणी सुमारे २५ ते ३० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली प्रवासी प्रतीक्षालये आज जीर्णावस्थेत पोहोचली असून अनेक ठिकाणी ती अक्षरशः खंडहर बनली आहेत. नियमित देखभाल व



दुरुस्तीअभावी छताचे प्लास्टर कोसळत आहे, भिंतींना तडे गेले आहेत, तर काही ठिकाणी सिमेंट निखळून लोखंडी सळ्या बाहेर दिसत आहेत. त्यामुळे या प्रतीक्षालयांमध्ये बसणे प्रवाशांसाठी धोकादायक ठरत आहे. पावसाळ्यात छत गळत असल्याने प्रवाशांना बसण्याची कोणतीही सोय राहत नाही. परिणामी महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांना उघड्यावर उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. सद्यस्थितीत ही प्रतीक्षालये कधीही कोसळण्याची शक्यता असून मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) यांनी तातडीने या जीर्ण प्रवासी प्रतीक्षालयांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करावी, अशी मागणी केली आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास मोठी दुर्घटना घडू शकते, त्यामुळे संबंधित विभागाने त्वरित लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

---

## अस्थिका समाज, नागपूरतर्फे १२ ते १४ ऑगस्टदरम्यान १९ व्या दीपोत्सव सोहळ्याचे भव्य आयोजन १२ ऑगस्टपासून


### आदिपुरम दिनानिमित्त सुहासिनींची दीपपूजा, चेन्नईच्या कु. आध्या वेंकटेश यांचे प्रवचन, सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
अस्थिका समाज, नागपूरच्या वतीने यंदा १९ व्या वर्षाचा दीपोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. त्रिमूर्ती नगर येथील श्री गजानन महाराज मंदिरासमोरील श्री भगवती सभागृहात हा तीन दिवसीय धार्मिक सोहळा १२ ऑगस्ट ते १४ ऑगस्टदरम्यान आयोजित करण्यात आला असून, त्यासाठी समाजाने व्यापक तयारी पूर्ण केली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही विदर्भातील विविध भागांतील तसेच विविध समाजघटकांतील मोठ्या संख्येने सुहासिनींनी १४ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आदिपुरम दिनाच्या दीपपूजेसाठी नावनोंदणी केली आहे. या सोहळ्यात हजारो भाविक सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

१२ ऑगस्ट, बुधवारी सायंकाळी ६.१५ वाजता गणपती पूजन व घटस्थापनेने कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर चेन्नई येथील युवा प्रवचनकार कु. आध्या वेंकटेश (स्मा. विशाखा हरी यांच्या शिष्या) यांचे विशेष संकीर्तन प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. त्या पहिल्या दिवशी श्री शंकर गुरुवरम या विषयावर तर १३ ऑगस्ट रोजी सदा श्रेष्ठम् दयानिधिम या विषयावर प्रवचन करतील. त्यांच्या प्रवचनाला मास्टर हरेश मृदंगावर तर मास्टर नवनिधा कृष्णन व्हायोलिनवर साथ देणार आहेत. १४ ऑगस्ट रोजी मुख्य आदिपुरम दिनाचे कार्यक्रम सकाळी ७.२० वाजता गणपती पूजन, कन्या पूजन आणि कुमारी पूजनाने सुरू होतील. त्यानंतर स्वावलंबी नगर येथील वैदिक संशोधन केंद्राच्या विद्यार्थ्यांकडून गुरुजी श्री प्रवीण लिगडे यांच्या मार्गदर्शनाखाली वेदपारायण सादर करण्यात येईल. सकाळी १० वाजता सुहासिनींची मुख्य दीपपूजा पार पडणार असून, या धार्मिक विधीत मोठ्या संख्येने महिलांचा सहभाग अपेक्षित आहे. यानंतर श्रीनगर येथील अहिगिरी नंदिनी महिला समूहाकडून महिषासुर मर्दिनी या गीतावर आधारित विशेष नृत्य सादर करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचा समारोप दुपारी १२.३० वाजता देवी अंडाळ आणि देवी भवानी यांच्या मंगळआरतीने होईल. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल. अस्थिका समाजाच्या व्यवस्थापन समितीने



दीपपूजेसाठी नावनोंदणी केलेल्या सर्व सुहासिनींना सकाळी ७ वाजेपर्यंत सभास्थळी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून सर्व धार्मिक विधी नियोजित वेळेत सुरू करता येतील. तसेच नागपूर व परिसरातील भाविकांनी तीनही दिवस मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवी भवानी आणि देवी अंडाळ यांचे दर्शन व आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहनही समितीतर्फे करण्यात आले आहे.कार्यक्रमाबाबत अधिक माहिती तसेच नावनोंदणीसाठी इच्छुकांनी अस्थिका समाजाचे सचिव के. व्ही. नगराजन यांच्याशी संपर्क साधावा, असे समाजातर्फे कळविण्यात आले आहे.

## जनगणना कार्याचे मानधन तातडीने देण्याची मागणी

**शिक्षकांसह अन्य कर्मचाऱ्यांची जिल्हा प्रशासनाकडे मागणी**

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**
गोंदिया जिल्ह्यात जनगणना कार्यात सहभागी झालेल्या शिक्षकांसह अन्य कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन तातडीने अदा करण्यात यावे, अशी मागणी जनगणना कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील अनेक शिक्षक तसेच अन्य कर्मचाऱ्यांनी जनगणनेचे काम वेळेत आणि जबाबदारीने पूर्ण केले. जनगणना कार्यादरम्यान काही ठिकाणी तांत्रिक अथवा माहितीशी संबंधित किरकोळ त्रुटी आढळून आल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांनी नियमानुसार स्पष्टीकरण तसेच आवश्यक कागदपत्रे संबंधित कार्यालयात सादर केली आहेत. मात्र, जनगणना कार्य पूर्ण होऊन बराच कालावधी उलटूनही संबंधित शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांचे मानधन अद्याप वितरित करण्यात आलेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, आपल्या मेहनतीचा मोबदला कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

जनगणना कार्य हे अत्यंत महत्त्वाचे शासकीय काम असून, कडक उन्हात तसेच विविध अडचणींचा सामना करत शिक्षक व कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडली. त्यामुळे त्यांचे प्रलंबित मानधन विनाविलंब अदा करणे आवश्यक असल्याचे कर्मचाऱ्यांनी म्हटले आहे. जिल्हा प्रशासनाने जनगणना कार्यात सहभागी झालेल्या सर्व शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन तातडीने वितरित करावे, तसेच संबंधित विभागाला आवश्यक सूचना देऊन मानधन वितरणाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडून या न्याय्य मागणीवर सकारात्मक निर्णय घेऊन लवकरच मानधन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

---

# कर्जमाफी की शेतकऱ्यांची थट्टा?

## जाचक अटींच्या विळख्यात लाखो शेतकरी, किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश पोहरे यांचा सरकारला सवाल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी योजना ही शेतकऱ्यांना दिलासा देणारी नसून जाचक अटीच्या विळख्यात अडकवणारी असल्याची तीव्र टीका किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश पोहरे यांनी बुधवारी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत केली. कर्जमाफीची मोठी घोषणा करून दुसरीकडे इतक्या अटी लादल्या जात आहेत की, सरकारला प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यायचीच नाही का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

पोहरे पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील नियमितपणे कर्जफेड करणारा शेतकरी हा शासनाच्या दृष्टीने आदर्श असायला हवा. मात्र आज त्यालाच सर्वाधिक दुर्लक्षित केले




जात आहे. एखाद्या शेतकऱ्याचे पीक कर्ज २५ हजार असो, ५० हजार असो किंवा त्यापेक्षा कमी असो, अशा प्रत्येक नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्याला दोन लाख रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात यावे. प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्याला शिक्षा आणि थकबाकीदाराला वेगळे निकष, हे कोणत्याही परिस्थितीत योग्य नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी नव्याने पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी योजनेत समाविष्ट करण्याची मागणी केली. शेतीतील वाढलेला उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती, बाजारातील अस्थिरता आणि अपुरा हमीभाव यामुळे प्रत्येक शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहे. त्यामुळे अव्यवहार्य नोकरशाहीने वातानुकुलीत कक्ष्यात बसून तयार केलेले निकष लावून हजारो शेतकऱ्यांना योजनेबाहेर ठेवल्याचा टोमणा त्यांनी मारला.

पोहरे यांनी १९७० नंतरच्या कृषी धोरणावरही भाष्य केले. हरितक्रांतीनंतर संकरित बियाणे, रासायनिक खते आणि महागड्या निविष्ठांवर शेती अवलंबून गेली. उत्पादन वाढले; मात्र खर्च त्याहून अधिक वाढला. शेतीचा नफा कमी होत गेला आणि कर्जाशिवाय शेती करणे अशक्य बनले. त्यामुळे आजचा शेतकरी कर्जबाजारी होण्यामागे त्याची चूक नसून कृषी धोरणातील विसंगती जबाबदार असल्याचे त्यांनी नमूद केले.

मृत थकीत कर्जदारांच्या वारसांवर फार्मर आयडीची अट लादणे हे अमानुष असल्याची टीकाही त्यांनी केली. शेतकरी मृत्यूमुखी पडला किंवा आत्महत्या केली म्हणून त्याच्या कुटुंबाला शासनाच्या दारात हेलपाटे मारायला लावणे योग्य नाही. त्यामुळे ही अट तातडीने रद्द करून सर्व पात्र वारसांना कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

पोहरे यांनी २००८ मधील कर्जमाफीचा संदर्भ देत सांगितले की, तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली व्यापक स्वरूप कर्जमाफी देण्यात आली होती. त्यावर्षी हमीभावामध्ये ३० टक्के ते ७४ टक्केपर्यंत वाढ करण्यात आली होती, याची आठवणही त्यांनी करून दिली. मात्र त्यानंतर करण्यात आलेली भाववाढ महागाईचा विचार करता नगण्य केल्या गेली, त्यामुळे शेतकरी कर्जात फसला आहे. आज कर्जमाफी देतांना अटींचे असे जाळे विणले जात आहे की, योजना जाहीर झाली असली तरी प्रत्यक्ष लाभार्थी किती राहतील, हा प्रश्न आहे.

फडणवीस यांच्या नेतृत्वात पाशा पटेल, पंकजा मुंडे सोबत २०१३ ला काढलेल्या शेतकरी दिंडीत सत्ता आल्यास सोयाबीन आणि कापसाचे भाव वाढवून देवू, असे म्हणत फडणवीसांनी २०१४ ला सत्ता मिळवली. मात्र त्यानंतर आज १२ वर्ष झालेत, डबल इंजिन सरकार अन जाहीर केल्या प्रमाणे हमीभाव वाढवून दिले नाहीत. २०१४, २०१९ आणि २०२४ या तिन्ही निवडणुकांपूर्वी सत्ता मिळाल्यास शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, असे म्हणत सत्तेत बसलेल्या सरकारला कर्जमाफीचा विसर पडला होता.

**आश्वासनानंतरही शेतकरी कर्जमुक्त झाला नाही**
२८-२९ ऑक्टोबर २०२५ ला प्रमुख शेतकरी नेत्यांनी नागपूर चंद्रपूर व समृद्धीवर रस्ता रोको आंदोलन केल्यानंतर ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमुक्त करू, असे लेखी आश्वासन फडणवीस सरकारने शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाला दिले होते. ऑगस्ट महिना उजाडला तरी शेतकरी कर्जमुक्त झालेला नाही. ही योजना कागदोपत्री न ठेवता प्रत्यक्षात प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचे याची हमी द्यावी. सर्व जाचक अटी तात्काळ रद्द करून कर्जमाफी प्रक्रिया सुलभ करावी. अन्यथा ही योजना शेतकऱ्यांच्या जखमेवर फुंक तर मीठ चोळण्याचा प्रकार ठरेल, असा इशारा प्रकाश पोहरे यांनी दिला. भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होणार नाही, यासाठी सरकारला सर्वतोपरी मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

थोडक्यात

## दिल्लीत महाराष्ट्रातील ३३ मागासवर्गीय जातींचा बुलंद आवाज

### केंद्राच्या ओबीसी यादीत समावेशाच्या मागणीसाठी आमदार परिणय फुके यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मांडली भूमिका, केंद्रीय मंत्री बी. एल. वर्मा यांना निवेदन सादर



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

महाराष्ट्रातील लोधी समाजासह ३३ जातींचा केंद्र सरकारच्या इतर मागासवर्गीय केंद्रीय यादीत समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी एका शिष्टमंडळाने नवी दिल्ली येथे आयोजित अधिवेशनात प्रभावीपणे आपली भूमिका मांडली. या शिष्टमंडळाचे नेतृत्व आमदार परिणय फुके यांनी केले. या शिष्टमंडळात लोधी समाजाचे प्रतिनिधित्व करत राष्ट्रीय अध्यक्ष अनंतलाल दमाहे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नरेंद्र लिल्हारे तसेच राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील नागपुरे सहभागी झाले होते. प्रतिनिधींनी केंद्र सरकारसमोर ३३ जातींचा केंद्रीय मागासवर्गीय यादीत समावेश करण्याची गरज सविस्तरपणे मांडत समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक हिताच्या दृष्टीने ठोस पावले उचलण्याची मागणी केली. तसेच शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री बी. एल. वर्मा यांना महाराष्ट्रातील मागासवर्गीय समाजाच्या प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.

यावेळी प्रतिनिधींनी सांगितले की, अखिल भारतीय लोधी, लोधा, लोध अधिकारी-कर्मचारी संघ (आलोक) हा समाजाच्या हक्कांसाठी व न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने कार्यरत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी आणि केंद्राच्या ओबीसी यादीत योग्य स्थान मिळावे, हा संघटनेचा प्रमुख उद्देश आहे. समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकार त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करेल आणि दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या महत्त्वपूर्ण प्रश्नावर लवकरच निर्णय घेईल, असा विश्वास व्यक्त केला. शिष्टमंडळाच्या या प्रयत्नांचे महाराष्ट्रातील लोधी समाजासह संबंधित सर्व ३३ जातींच्या समाजबांधवांनी स्वागत करत, समाजहिताच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मत व्यक्त केले.

## उपसरपंच आशिष राऊततर्फे गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

महादुला, सेवानंद विद्यालयमध्ये गरीब गरजू, आणि होतकरू इयत्ता ९आणि इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना टेक्सबुक (पुस्तकाचे) वाटप कोराडी ग्रामपंचायत चे माजी उपसरपंच आशिष राऊततर्फे निःशुल्क वाटप करण्यात आले. सेवानंद विद्यालय स्टेजवर झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात अध्यक्ष म्हणूनशाळेचे मुख्याध्यापक बायस्कर होते.मंचावर त्यांच्यासमवेत प्रमुख अतिथी म्हणून लिलाधर भोयर होते कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन संदेश पटेल सर यांनी केले. कार्यक्रमाला उपस्थित सगळ्या पाहुण्यांचे स्वागत मुख्याध्यापक बायस्कर सर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. समाजसेवक आशिष राऊत यांनी विद्येची देवता माता सरस्वती यांच्या फोटोचे पूजन करून प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात झाली. शाळेचे मुख्याध्यापक बायस्कर म्हणाले की, आमची शाळा गरीब वंचित बहुजनांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सदैव तत्पर आहे. शाळा सुरू होऊनही या गरीब मुला/मुलींकडे पाठ्यपुस्तक नव्हती त्यामुळे शिक्षण घेणे त्यांना कठीण जायचे. आम्ही सदर बाब माजी उपसरपंच आशिष राऊत यांना सांगितली आणि त्यांनी देखील या पुण्य कामाला लगेच होकार दिला आणि या गरीब लेकरांची शिक्षणाची सोय सुकर झाली.

यावेळी आशिष राऊत यांनी २५२पाठ्यपुस्तके ज्या ज्या मुलांकडे जे जे पुस्तक कमी होते ते देण्यात आले आणि ज्यांच्याकडे एकही पुस्तक नवती त्याचा पूर्ण संच मुलांना त्यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे शाळेचे प्रमुख म्हणून मुख्याध्यापकांनी आशिष राऊतचे आभार मानले. यावेळी मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. यावेळी मंचावर प्रमुख उपस्थिती लोणखैरी चे सरपंच लिलाधर भोयर यांचे स्वागत करण्यात आले कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हायस्कूलचे शिक्षक संदेश पटेल, पराग सपाटे, शंकर रत्ने, सुवर्णा बोबडे, प्राजक्त वऱ्होकर, उज्वला गोंडोळे, रामपुरे, संगीता चोपडे, प्रभाकर ठमके, संतोष बुदे, साबळे, मृणाली येवले, अश्विनी बर्वे, आगरकर, अमित राऊत शिक्षकेतर कर्मचारी मोहन रंगारी, सहारे, जीवन हिवरकर, धनुसाव बनसापाल, श्रीकांत मेश्राम यांनी स्कूल प्रोग्राम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मनपातर्फे गोंड राजे बख्त बुलंद शाह यांना विनम्र अभिवादन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर नगरीचे संस्थापक गोंड राजे बख्त बुलंद शाह यांना जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे अभिवादन करण्यात आले. महापौर निता



ठाकरे,उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी विधान भवन चौक स्थित गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. त्याचप्रमाणे शूरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या बलिदान दिवस व चिमासाहेब भोसले यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. मनपाच्या उपमहापौर लिला हाथीबेड यांनी रामनगर चौक स्थित शूरवीर बाजीप्रभू देशपांडे आणि रघुजीनगर ताजबाग चौक येथील चिमासाहेब भोसले यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी मनपाचे कर्मचारी, अग्निशमन जवान व नागरिक उपस्थित होते.

# ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी एक अनोखा उपक्रम

### ओसरी प्रॉडक्शन्सतर्फे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ६५ वर्षांवरील ज्येष्ठांसाठी फॅशन शो

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ओसरी प्रॉडक्शन्सच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी एक आगळावेगळा "ज्येष्ठ नागरिक फॅशन शो" आयोजित करण्यात आला आहे. २१ ऑगस्ट रोजी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन असून त्यानिमित्ताने पूर्वसंध्येला म्हणजे २० ऑगस्ट २०२६ रोजी हा विशेष उपक्रम राबवला जाणार आहे.

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा असल्या, तरी एखाद्या शहराचा खरा "हॅपिनेस इंडेक्स" तेथील नागरिकांच्या चेहऱ्यावरील आनंद, समाधान आणि सन्मानाने जगण्याच्या भावनेवर अवलंबून असतो. शहराची ओळख केवळ उंच इमारती, रुंद रस्ते किंवा आधुनिक सुविधांनी होत नाही, तर तेथील नागरिकांमधील जिव्हाळा, सामाजिक बांधिलकी आणि प्रत्येक वयोगटाचा सन्मान यावरही ती ठरते.

याच विचारातून ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंद, आत्मविश्वास आणि उत्साहाचे रंग भरावेत, त्यांना समाजाच्या केंद्रस्थानी आणावे आणि त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण साजरा व्हावा, या उद्देशाने या अनोख्या फॅशन शोचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ओसरी प्रॉडक्शन्सचे प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा फॅशन शो केवळ रॅम्पवर चालण्यापुरता मर्यादित नसून, ज्येष्ठांच्या अनुभवाचा, आत्मविश्वासाचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याच्या वृत्तीचा उत्सव ठरणार आहे. "वय ही केवळ एक संख्या आहे; उत्साह, स्वाभिमान आणि जगण्याची उमेद यांना वयाची मर्यादा नसते," हा संदेश या उपक्रमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



या उपक्रमात सहभागी होण्यासाठी ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांनी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून, त्यानंतर प्रारंभिक चाचणी घेतली जाणार आहे. फॅशन शोसाठी सराव वर्ग ५ ऑगस्टपासून सुरू होणार आहेत. इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी व अधिक माहितीसाठी ९३७३१००८९१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विष्णू मनोहर यांनी केले.

## १५-२० वर्षापूर्वीचा गेटयुक्त बंधारा ठरतोय मृत्यूचा सापळा; जीव मुठीत धरून नदी पार करतायत शेतकरी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - प्रकाश टेंबरे**

सालेकसा तालुक्यातील ग्राम जमाकुडो येथील आश्रमशाळेच्या मागील नदीवर सुमारे १५ ते २० वर्षापूर्वी बांधण्यात आलेला गेटयुक्त बंधारा आज अत्यंत जीर्ण अवस्थेत पोहोचला असून तो शेतकरी आणि ग्रामस्थांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत आहे. एकेकाळी नदीपलीकडील शेतजमिनीपर्यंत सुरक्षित पोहोचण्यासाठी आधार ठरलेला हा बंधारा आता कोसळण्याच्या स्थितीत असून, विशेषतः पावसाळ्यात जीव धोक्यात घालून प्रवास करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, गेल्या दोन-तीन वर्षांपासून बंधाऱ्याची अवस्था सातत्याने खालावत आहे. बंधाऱ्याच्या अनेक भागांमध्ये मोठे तडे गेले असून दोन्ही बाजूंना नदीकाठाची मोठ्या प्रमाणावर धूप झाली आहे. त्यामुळे बंधाऱ्यावरून



चालणेही धोकादायक बनले आहे. तरीही नदीच्या पलीकडे असलेल्या शेतांपर्यंत जाण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना नाईलाजाने याच मार्गाचा वापर करावा लागत आहे.

धोकादायक परिस्थितीत शेतकरी आणि ग्रामस्थ बांबू व लाकडांच्या साहाय्याने तात्पुरती चेली तयार करून नदी पार करत आहेत. पावसाळ्यात नदीची पाणीपातळी वाढल्यानंतर ही चेलीही पूर्णपणे असुरक्षित ठरते. त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एखादी व्यक्ती अथवा जनावर पुराच्या पाण्यात वाहून गेल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दररोज शेतीची कामे, पिकांची देखभाल तसेच जनावरे शेतात ने-आण करण्यासाठी शेतकऱ्यांना या मार्गाचा वापर करणे भाग पडत आहे. मात्र जीर्ण बंधाऱ्यामुळे त्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून शेतीची कामेही अडचणीत आली आहेत. सुरक्षित मार्ग नसल्याने प्रत्येक दिवस भीतीच्या सावटाखाली जात असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

ग्रामस्थांनी प्रशासन, पाटबंधारे विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे तातडीने बंधाऱ्याचे तांत्रिक परीक्षण करून त्याच्या दुरुस्ती अथवा पुनर्बांधणीस मंजुरी देण्याची मागणी केली आहे. तसेच नदीकाठावरील धूप रोखण्यासाठी संरक्षण भिंतीसह आवश्यक उपाययोजना त्वरित करण्यात याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

"मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासन जागे होणार का?" असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. केवळ आश्वासनांवर समाधान मानण्याची वेळ आता संपली असून, या जीवघेण्या बंधाऱ्याबाबत तात्काळ कार्यवाही करून नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करावे, अशी एकमुखी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## हिंगणा तालुक्यातील २५ योजनाबाह्य रस्त्यांना मंजुरी

### १५३.५० कि.मी. रस्त्यांचा विकासाचा मार्ग मोकळा, ग्रामीण भागातील दळणवळणाला मिळणार चालना, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्याला यश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील योजनाबाह्य व अवर्गीकृत २५ रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून मान्यता देत त्यांचा रस्ते विकास योजना २००१-२१ मध्ये समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील एकूण १५३.५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे ग्रामीण भागातील दळणवळण, शेतीमालाची वाहतूक आणि नागरिकांच्या प्रवासाला मोठा दिलासा मिळणार आहे.

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या प्रस्तावाला तसेच जिल्हा परिषद, नागपूर यांच्या ठरावाला मान्यता देत ग्रामविकास विभागाने हा शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार संबंधित

> हिंगणा तालुक्यातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या योजनाबाह्य रस्त्यांना शासनाने मंजुरी दिल्यामुळे ग्रामीण नागरिकांना दर्जेदार रस्ते सुविधा उपलब्ध होतील.

रस्त्यांचा रस्ते विकास योजनेत समावेश करण्यात आला असून आवश्यक त्या पुढील कार्यवाहीचे निर्देशही संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे शेती, शिक्षण, आरोग्य आणि उद्योग क्षेत्राला याचा मोठा फायदा होईल. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून विकासकामांना यापुढेही प्राधान्य दिले जाईल. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे मनःपूर्वक आभार.

## सैराट फेम अभिनेता अरबाज शेखच्या वडिलांचे निधन

**वृत्तसंस्था, मुंबई**

सैराट फेम अभिनेता अरबाज शेख याचे वडील अस्लम शेख यांचे आज निधन झालं. ब्रेन हॅमेरेजवर मागील महिन्याभरापासून



त्यांच्यावर सोलापुरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचारादरम्यान, आज दुपारी त्यांचे त्यांचे निधन झालं आहे. त्यांच्या निधनानंतर विविध स्तरातून शोककळा व्यक्त केली जात आहे. सैराट फेम अभिनेता अरबाज शेख याने काही दिवसांपूर्वी वडिलांच्या उपचारासंदर्भात रडत रडत एक व्हिडिओ केला होता. सोलापूरमधील नोबेल हॉस्पिटलच्या मनमानी कारभारावर त्याने आरोप केले होते. या हॉस्पिटलच्या मेडिकलमधून औषध खरेदीसाठी सक्ती करण्यात येत असल्याचं अरबाजने व्हिडिओच्या माध्यमातून सांगितलं होतं. त्यानंतर एफडीएने कारवाई करत नोबेल हॉस्पिटलमधील संबंधित मेडिकल दुकानांची तपासणी करून या दुकानांवर कारवाई केली होती.

# आमदार संजय पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त ६ व ७ ऑगस्ट रोजी विविध सामाजिक उपक्रम

### मोफत आरोग्य तपासणी, चष्मे वाटप, रक्तदान शिबिरासह वाचनालय व आरोग्य उपकेंद्रांचे लोकार्पण, अनेक मान्यवरांची राहणार उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संजयभाऊ पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त सविताताई पुराम, महाराष्ट्र प्रदेश महिला उपाध्यक्ष, बिरसा फाउंडेशन, पुराडा व मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ व ७ ऑगस्ट २०२६ रोजी विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांमध्ये मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप, आरोग्य निदान शिबिर, भव्य रक्तदान शिबिर, वाचनालय लोकार्पण, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र लोकार्पण, वृक्षारोपण तसेच वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याचा समावेश आहे.

दि. ६ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत हरीहरभाई पटेल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चिरचाळबांध येथे मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप व आरोग्य निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायकरामजी भेंडारकर, अध्यक्ष, जिल्हा परिषद गोंदिया राहणार असून उद्घाटन अविनाशजी ब्राह्मणकर, आमदार, विधान परिषद यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाला केशवरावजी मानकर, भैरसिंगभाऊ नागपुरे, सुरेशभाऊ हर्षे, विजयभाऊ शिवणकर, नरेंद्रजी वाजपेयी, ॲड. येशुलालजी उपराडे, योगीताताई फुंडे, सुरेंद्रजी नायडू, सुनंदाताई उके, किशोरभाऊ महारवाडे, रंजनजी गौतम, हनुमंतरावजी वट्टी, तिलकचंदजी मडावी, सरिताताई हरिणखेडे, गीता ताई शेंडे, रमेशलालभाऊ कटरे, बाबूलालजी तुरकर, ललिताताई भाजीपाले, सुभाषभाऊ पटले, बालाजी बिरसने, लक्ष्मीनंदजी ठाकरे, खेमेंद्रजी सिंगाईत, कैलाशजी कटरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तसेच दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता डी. फार्म (फार्मसी) कॉलेज, रिसामा (आमगाव) येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. सीताताई रहांगडाले, जिल्हाध्यक्ष, भाजप गोंदिया राहणार असून उद्घाटन मा. विरेंद्रजी अंजनकर, संघटन मंत्री, भाजप भंडारा-गोंदिया यांच्या हस्ते होणार आहे.

रक्तदान शिबिराला केशवरावजी मानकर, भैरसिंगभाऊ नागपुरे, विजयभाऊ शिवणकर, ॲड. येशुलालजी उपराडे, पंकजभाऊ रहांगडाले, आफताप शेख, नरेंद्रजी वाजपेयी, अनिलजी जोशी, अनिलजी बिसेन, योगीताताई फुंडे, राजुभाऊ उईके, सुरेखाताई उके, शालीकरामजी गुरुनुले, प्रज्ञाताई रंगीटवार, हलवंतरावजी बुट्टी, संदीपभैया भाटिया, किशोरभाऊ महाकवडे, कल्पनाताई बावणे, अर्चनाताई मडावी, प्राणमोहनसिंगजी उपराडे, रामफलताई गायकवाड, अंबिकाताई बंजार, वैशालीताई पंधरे, ममताताई अंबादे, रितेशजी अग्रवाल, पिंकीताई कटकटवार, नुतनताई रघायाम, महेशजी जैन, कौशलबाई कुंभरे, संजवणी दवंडे, नलिनाभाऊ प्रेमशाम, शकीलजी कुरेशी, तनुजाताई भालवी, रिताताई रंगारी, कमलबाई प्रेमशाम, डॉ. राजेंद्रजी बडोले, सुनीलभाऊ उईके, संदीपभाऊ टेकाम, प्रभाताई ईंदीवार, प्रतिभाताई शिवणकर, अजयकुमारजी डोंगे, किशोरजी गावराने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

याशिवाय दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता पुराडा येथे क्रांतिसूर्य बिरसा मुंडा पूजन, सकाळी १० वाजता प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व वाचनालय लोकार्पण, सकाळी १०.३० वाजता पदमपूर (आमगाव) येथे वाचनालय लोकार्पण, दुपारी ३ वाजता बोरगाव (बा.) येथे वृक्षारोपण तसेच सायंकाळी ४.३० वाजता



देवरी येथील आमदार संजय पुराम यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजप महिला आघाडी, देवरी यांच्या वतीने वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

आमदार संजय पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या विविध सामाजिक उपक्रमांमधून आरोग्यसेवा, रक्तदान, शिक्षणासाठी वाचनालये आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोफत आरोग्य सेवा, रक्तदान व इतर सामाजिक उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सौ. सविताताई पुराम, बिरसा फाउंडेशन, पुराडा व मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : शुक्रवार, ३१ जुलै २०२६

थोडक्यात

## खोटी साक्ष देण्यासाठी युवकाचे अपहरण

### मारहाण, जीवे मारण्याची धमकी, वकिलासह चौघांवर गुन्हा दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

न्यायालयात आरोपींच्या बाजूने खोटी साक्ष देण्यासाठी एका युवकाचे अपहरण करून त्याला जबरदस्तीने नागपूर येथे नेणे, मारहाण करणे आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी उमरेड पोलिसांनी एका वकिलासह चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बी एन एस) अंतर्गत गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अरुण सर्जेराव पाटील वय ३२, रा. मलक नगर झोपडपट्टी, रेल्वे स्टेशनमागे, उमरेड यांनी दिलेल्या तक्रारीवरून राकेश शंकर महाकाळकर रा. इतवारी पेठ, उमरेड, प्रदूग्न दिलीप शंभरकर रा. रानबोडी, उमरेड अक्षय ऊर्फ चिवडा वसंतराव पाटील रा. न्यू सब्जी मंडीजवळ, इतवारी पेठ, उमरेड आणि रमेश हरिराम रावनानी रा. जरीपटका, नागपूर, व्यवसाय - वकील यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, २८ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजल्यापासून २९ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत आरोपींनी फिर्यादीचे अपहरण करून त्याला नागपूर येथे नेले. त्यानंतर न्यायालयात आरोपींच्या बाजूने खोटी साक्ष देण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकण्यात आला. तसेच मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत खोटी साक्ष देण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. मात्र, फिर्यादीने न्यायालयात खरी घटना सांगितल्यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला. त्यानंतर उमरेड पोलिसांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम १४०(४), २३२(१), १२७(७), ३५१(३) आणि ३(५) अन्वये गंभीर गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भाग्यश्री कुलकर्णी करीत असून, आरोपींच्या अटकेसाठी पोलीस प्रयत्नशील असल्याची माहिती मिळाली आहे.

## भाऊजी दप्तरी इंग्लिश स्कूलला संगीत पारितोषिकासाठी देणगी



धनादेश आणि स्मृतिचिन्ह स्वीकारताना गजानन पिलपिले. त्यांच्या शेजारी डॉ. मधुरा धोपावकर, गीता मुजुमदार, विनोद देशमुख, अरुंधती देशमुख आणि डावीकडे प्राचार्य ठेमदेव.

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी यांचे मानसपुत्र स्व. प्रा. विद्याधर व्यंकटेश वझलवार (शांतिनिकेतन) यांच्या स्मरणार्थ महालातील भाऊजी दप्तरी इंग्लिश स्कूलला १ लाख रुपयांची देणगी देण्यात आली आहे. वझलवारांच्या ज्येष्ठ कन्या गीता मुजुमदार यांनी आज या रकमेचा चेक शाळेचे संचालन करणाऱ्या भारतीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष गजानन पिलपिले यांच्या सुपूर्द केला आणि वझलवार जन्मशताब्दी वर्षाचे स्मृतिचिन्हही भेट दिले. या देणगीच्या रकमेवरील व्याजातून दरवर्षी शाळेतील एका विद्यार्थ्याला संगीतात उत्कृष्ट ठरल्याबद्दल पारितोषिक दिले जाणार आहे. याप्रसंगी मुजुमदारांच्या भगिनी अरुंधती देशमुख, नात डॉ. मधुरा धोपावकर, ज्येष्ठ पत्रकार विनोद देशमुख या कुटुंबीयांसह शाळेच्या प्राचार्य जान्हवी ठेमदेव, शिक्षिका सारिका सातपैसे आदी उपस्थित होते.

## धाडसी पंपचालक नरेश राऊत यांनी दोन शाळकरी मुलांचे वाचविले प्राण

### मुसळधार पावसात स्वतःचा जीव धोक्यात घालून दाखविले धैर्य; एमआयडीसीकडून प्रशस्तीपत्र देऊन गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

२८ जुलै २०२६ मंगळवारी) रोजी दुपारी ३ ते ५ वाजताच्या सुमारास नागपूर परिसरात झालेल्या मुसळधार पावसा दरम्यान हिंगणा जॅकवेल परिसरात पाण्याच्या प्रचंड प्रवाहात अडकलेल्या



दोन शाळकरी मुलांचे प्राण धाडसीपणे वाचविणाऱ्या नरेश राऊत (पंपचालक, जॅकवेल, हिंगणा, नागपूर) यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्या दिवशी जैवविविधता उद्यान (बायोडायव्हर्सिटी पार्क) परिसरात फिरण्यासाठी गेलेली दोन शाळकरी मुले WTP जॅकवेल अप्रोच रोडजवळील नाल्यातील पाण्याच्या वेगवान प्रवाहात अडकली होती. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नरेश राऊत यांनी प्रसंगावधान राखत तातडीने दोरीची व्यवस्था केली. स्वतःच्या कमरेला दोरी बांधून जीवाची पर्वा न करता ते पाण्याच्या प्रवाहात उतरले आणि दोन्ही मुलांना सुखरूप बाहेर काढून त्यांचे प्राण वाचविले.

या धाडसी कार्याची दखल घेत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्या विदर्भ विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी नरेश राऊत यांना अभिनंदन व प्रशस्तीपत्र प्रदान करून त्यांच्या शौयार्चा गौरव केला. प्रशस्तीपत्रात त्यांच्या धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि प्रसंगावधानाचे विशेष कौतुक करण्यात आले आहे. नरेश राऊत यांच्या या धाडसी कृतीमुळे दोन निष्पाप विद्यार्थ्यांचे प्राण वाचले असून, त्यांच्या कार्याबद्दल सामाजिक, प्रशासकीय तसेच नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या साहसी कार्याने संकटसमयी धैर्य, मानवता आणि कर्तव्यभावनेचे प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे राष्ट्रीय संयोजक, योगेश पाथरे राष्ट्रीय शिक्षक पालक संघटन, भारत यांनी दिली.

# 'दारूमुक्त अंबाडा'चा निर्धार; तारा शिवारात महिला मंडळाची धाड, १२ पिपे गावठी दारूचे पिपे जागीच नष्ट

### महिला मंडळाच्या लढ्याची पोलीस अधीक्षकांनी यापूर्वीच घेतली होती दखल, आरोपी मात्र पसार

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

"अवैध दारू कायमस्वरूपी बंद करणार आणि करूनच दाखवणार" हे ब्रीदवाक्य घेऊन अंबाडा येथील महिला मंडळाने सुरू केलेल्या मोहिमेला बुधवारी (२९ जुलै) पुन्हा एक मोठे यश मिळाले. दुपारी सुमारे २ वाजता अंजली भड यांच्या नेतृत्वाखाली महिला मंडळाने तारा शिवारात धाड टाकून गावठी दारू निर्मितीसाठी ठेवलेले १२ पिपे जागीच नष्ट केले. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



महिला मंडळाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तारा शिवारात मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार करण्यासाठी रसायन साठवून ठेवण्यात आल्याचे आढळून आले. त्यानंतर महिला मंडळाने तातडीने जलालखेडा पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. ठाणेदारांच्या निर्देशानुसार पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा व पुढील कारवाई केली. मात्र पोलिसांचे पथक येण्यापूर्वीच अवैध दारू व्यवसाय करणारा संशयित घटनास्थळावरून पसार झाला.

विशेष म्हणजे, या घटनेपूर्वीच नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अनिल मस्के यांनी अंबाडा गावाला भेट देऊन महिला मंडळाच्या अवैध दारूविरोधातील लढ्याची दखल घेतली होती. त्यांनी ग्रामपंचायतीत झालेल्या बैठकीत महिला मंडळाच्या धाडसी कार्याचे कौतुक केले होते. तसेच अवैध दारू व्यवसायाविरोधात पोलीस प्रशासन कठोर कारवाई करेल, असे आश्वासनही दिले होते.

गेल्या काही दिवसांपासून महिला मंडळाच्या सातत्यपूर्ण कारवाईमुळे अंबाडा परिसरातील अवैध दारू व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महिलांनी स्वतः पुढाकार घेत अनेक ठिकाणी धाडी टाकत गावठी दारूचे पिपे नष्ट केले असून, त्यामुळे दारू माफियांचे आर्थिक नुकसान होत असल्याची चर्चा परिसरात आहे.

महिला मंडळाने पुन्हा एकदा स्पष्ट केले की, "अंबाडा पूर्णपणे दारूमुक्त झाल्याशिवाय हा लढा थांबणार नाही." अवैध दारू व्यवसाय करणाऱ्या मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर गुन्हे दाखल करावेत, तसेच सराईत आरोपींना तडीपार करण्याची कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

महिला मंडळाच्या या धाडसी मोहिमेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून, अंबाडा परिसरात अवैध धंद्यांविरोधात जनआंदोलन अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# गुरुविणा जिवन निरर्थक : तालुका प्रचार प्रमुख गजानन कवाने

### गुरुपोर्णिमा निमित्त रंगली भजन संध्या

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

जो अज्ञानाचा अंधकार नष्ट करतो,मंत्र तंत्र धन न घेता शिष्यास सदवस्तूची प्राप्ती करून सन्मार्गाला लावतो, जात, धर्म, संप्रदायाचे बंधन तोडून लिंगदेहाची गाठ सोडतो अश्या गुरूंप्रती अपार श्रद्धा व अटळ निष्ठा ठेवावी,आपल्या सत्कार्यास गुरुप्रती समर्पित केल्याने अहंकार विरहित कार्य होते म्हणून गुरुविणा जिवन निरर्थक आहे असे प्रतिपादन कवी,गायक, कीर्तनकार गजानन कवाने यांनी सामुदायिक प्रार्थनेत केले.

आशिष गिराम यांचे टिळकवार्ड निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली. यावेळी कासार समाजभूषण मोहन नागपूरकर, जीवन गौरव पुरस्कार प्राप्त ज्ञानेश्वर ताकतोडे, पुसद तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे,राष्ट्रीय कीर्तनकार आकाश ताविडे महाराज, तालुका भजन प्रमुख नरेश ढाले, मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून प्रसिद्ध गायक,वादक स्वर्गीय प्रकाशराव किसनराव गिराम व



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. गुरुकुंज मोझरी येथील सदस्य मधुकर आजमिरे यांच्या आदेशानुसार सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. त्यात अर्जीपद, नामधून, नामजप, मार्गदर्शन, शांतिपाठ, आत्मचिंतन, सामूहिक नमस्कार व जयघोष घेण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करतांना कवाने पुढे म्हणाले की राष्ट्रसंतांनी ज्ञानाच्या सप्तभूमिकावर अधिकार असणाऱ्या परमहंस आडकोजी महाराजांना सदभावे स्वीकारले, प्रथम आईवडील गुरू असले तरी आत्मोन्नती करणाऱ्या गुरुची आवश्यकता आहे, कलियुगात गुरूंचा सुळसुळाट झाला आहे परंतु खरा गुरु कोण याची विवेक बुद्धीने पारख करणे आवश्यक आहे, गुरूचे पदकमल दिव्यबोध व दिव्यसाधना होय त्यांनी दाखवलेल्या मार्गावर गेल्यास जिवन कृतार्थ होते यावेळी त्यांनी गुरू शिष्य परंपरेवर प्रकाश टाकून संत, सद्गुरू व शिष्यांची अनेक उदाहरणे दिली.

यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. हार्मोनियम आर्यन परतवार, अशोक भगत महाराज, यशवंत भगत,रिषभ तोडसाम तबला आशिष परतवार, अनिल अस्वार, खंजिरी सुरेश कदम, प्रा.आकाश ताविडे यांनी साथसंगत जितेंद्र किन्हेकर, गजानन गव्हाणकर,श्यामराव देशमाने,बाबासाहेब वाघमारे पंजाब गडदे,साहेबराव सरकटे, प्रशांत कदम सूरज केळकर महिला प्रतिनिधी महिला भजन प्रमुख कमल गडदे,ग्रामगीताचार्य मुक्ता काळबांडे,महिला प्रचार प्रमुख रंजना किन्हेकर,विमल वाघमारे,मंदा पाचकोरे,शोभा चिद्दरवार,श्रीमती कुमुदिनी प्रकाश गिराम यांनी केली.

रुपाली गिराम व आशिष गिराम यांच्या हस्ते मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अर्चना शिंदे,अक्षय राठोड, गजानन वजिराबाद, अधिराज व प्रियांशु गिराम सह असंख्य स्त्री पुरूष आबालवृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

# नागपुरात ऑन-स्ट्रीट पार्किंग अन् पथ विक्रेत्यांच्या व्यवस्थापनासाठी मनपा नियोजन करणार

### मनपा आयुक्त डॉ. विपिन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक, १० रस्त्यांवर पथविक्रेते व्यवस्थापनाचा पायलट प्रोजेक्ट

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहरातील वाहतूक कोंडीच्या समस्यांवर मात करण्याकरिता तसेच रस्ते व पदपथ अधिक मोकळे आणि चालण्यासाठी सुरक्षित करण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. विपिन यांच्या अध्यक्षतेखाली मनपा मुख्यालयात ऑन-स्ट्रीट पार्किंग आणि पथविक्रेते व्यवस्थापन या महत्त्वाच्या विषयांवर उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली.



बैठकीस नागपूर शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त आदित्य मिरखेलकर, मनपाचे उपायुक्त मंगेश खवले, मुख्य अभियंता लीना उपाध्ये, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे यांच्यासह आयटीडीपी इंडिया', पीडीए पुणे' आणि आयआरटीई या तज्ज्ञ संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत आयटीडीपी इंडिया' संस्थेने नागपुरातील ऑन-स्ट्रीट पार्किंग रणनीती आणि झोननिहाय रस्त्यांची निवड यावर पीपीटी सादरीकरण केले. आयुक्त डॉ. विपीन यांनी शहरातील निवडक रस्त्यांची अचूक माहिती गोळा करण्यासाठी तातडीने सल्लागार/ सर्व्हेअर नियुक्त करण्याचे निर्देश मनपाच्या प्रकल्प विभागाला दिले आहेत. तसेच पार्किंगच्या नियोजनाबाबत सर्व संबंधित विभागांत समन्वय साधण्यासाठी मनपा अधिकारी, नागपूर वाहतूक पोलीस, नागपूर सुधार प्रन्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महामेट्रो यांच्या उपस्थितीत लवकरच एका विशेष कार्यशाळेचे आयोजन केले जाणार आहे.

तर पीडीए पुणे' चमूने धरमपेठ झोन, फुटाळा परिसर आणि मेडिकल कॉलेज चौकातील विक्रेता व्यवस्थापनाचे डिझाइन सादर केले. मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी धरमपेठ आणि लक्ष्मी नगर परिसरातील १० प्रमुख रस्त्यांची निवड करून तेथे पथविक्रेत्यांच्या शिस्तबद्ध व्यवस्थापनासाठी पायलट प्रोजेक्ट राबविण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच आयआरटीई संस्थेने शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण, सुधारणा आणि वाहतूक सुलभ करण्यासाठीच्या डिझाइनचे सादरीकरण केले.

## सुर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती मंडळात बाल चमुंची दिंडी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई - प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर**

दरवर्षी प्रमाणे आषाढी एकादशी निमित्त लाखो वारकरी पंढरपुरात दिंडी घेऊन दाखल होत असतात. महाराष्ट्रातूही विविध ठीकांणाहून



दिंड्या विठु माऊली चरणी लीन होत असतात. मुंबईतही आषाढी एकादशी हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो.महाराष्ट्राचे आराध्यदैवत अर्थातच विठू रखुमाई पंढरीची वारी अर्थातच संजीवन सोहळा, हे सगळ मराठी मातीने आणि मनाने हृदयात साठवून ठेवला आहे अगदी बालगोपाल मंडळी सुद्धा आपल्या बोबड्या बोलाने टाळ मृदूंगाच्या तालावर तल्लीन होऊन छोट्या वारीत सहभागी होतात यालाच संस्कार अस म्हणतात. अशीच एक संस्कारक्षम संस्था दादर माहीम विभागात कार्यरत आहे. सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती परस्पर सहाय्यक मंडळ या नावाने प्रसिद्ध आहे. या संस्थेच्या माध्यमातून आषाढी एकादशीला बालवीरांची संस्कारक्षम दिंडी काढण्यात आली.सामाजिक प्रबोधनात्मक संस्कार दिंडी मध्ये बालचमुने सहभाग विठ्ठल नामाच्या गजरात तल्लीन होऊन सर्वांनांच मंत्रमुग्ध केले. बालवीरांच्या या दिंडीचे सर्व थरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# उमरेडच्या प्रमोद उरकुडे यांचा चेन्नईतील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या हेक्सावेअर ड्रीम रनर्स हाफ मॅरेथॉनमध्ये दैदिप्यमान विजय

### व्हेटरन गटात प्रथम, एकूण स्पर्धेत नववा क्रमांक

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड- मनिष शिंगणे**

उमरेड शहरातील आघाडीचे धावपटू प्रमोद उरकुडे यांनी चेन्नई येथे आयोजित १५ व्या हेक्सावेअर ड्रीम रनर्स हाफ मॅरेथॉन मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत उमरेडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. १० किलोमीटर स्पर्धेत त्यांनी व्हेटरन पुरुष गटात प्रथम क्रमांक पटकावत एकूण ३,९६४ स्पर्धकांमधून नववा क्रमांक मिळविला.

विशेष म्हणजे, आयोजकांनी प्रमोद उरकुडे यांच्या मागील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांची 'कॉरल रनर म्हणून निवड केली होती. त्यामुळे त्यांना अ श्रेणीचा इब्ह क्रमांक १०७९१ देण्यात आला आणि शर्यतीच्या दिवशी प्रारंभ रेषेच्या अगदी पुढील रांगेतून धावण्याची संधी देण्यात आली. ही निवड केवळ सातत्यपूर्ण आणि उच्च दर्जाची कामगिरी करणाऱ्या धावपटूंनाच दिली जाते.

चेन्नई येथे झालेल्या या स्पर्धेत प्रमोद उरकुडे यांनी ३५ मिनिटे ५६ सेकंद (नेट टाइम) मध्ये १० किलोमीटर अंतर पूर्ण केले. त्यांचा गन टाइम ३६ मिनिटे, प्रति किलोमीटर ३ मिनिटे ३५ सेकंद असा वेग असून ताशी १६.६ किलोमीटर इतका सरासरी वेग त्यांनी राखला.

**स्पर्धेतील त्यांची कामगिरी पुढीलप्रमाणे**

हेक्सावेअर ड्रीम रनर्स हाफ मॅरेथॉन २०२६ चेन्नई
अंतर : १० किलोमीटर
इब्ह क्रमांक : १०७९१
विशेष श्रेणी : कॉरल रनर



एकूण स्पर्धक : ३,९६४
एकूण क्रमांक : ९ वा
पुरुष गटातील क्रमांक : ९ वा (२,९९५ पैकी)
व्हेटरन पुरुष गटातील क्रमांक : १ ला (४६८ पैकी)
नेट वेळ : ३५:५६
गन वेळ : ३६:००
प्रति कि.मी. वेळ : ३:३५
सरासरी वेग : १६.६ कि.मी./तास

स्पर्धेनंतर आयोजकांनी प्रमोद उरकुडे, उमरेड यांचे अभिनंदन करत अधिकृत टायमिंग बॅज प्रदान केला. तसेच त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रमोद उरकुडे यांच्या या उल्लेखनीय यशामुळे उमरेड शहरासह संपूर्ण नागपूर जिल्ह्याचा गौरव वाढला असून, क्रीडा क्षेत्रातील अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील युवकांमध्ये धावण्याबाबत नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

थोडक्यात

## राज्य अन्न आयोगाच्या तीन दिवसीय नागपूर दौऱ्याला प्रारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्य अन्न आयोगाच्या तीन दिवसीय नागपूर दौऱ्याची गुरुवारी सुरुवात झाली. दौऱ्याच्या प्रारंभी राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे, सदस्य ईश्वर बाळबुधे तसेच अप्पर जिल्हाधिकारी तथा जिल्हा तक्रार निवारण अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची औपचारिक भेट घेतली. यावेळी सार्वजनिक वितरण प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. यानंतर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत नागरी पुरवठा विभाग, महिला व बालविकास विभाग, शालेय पोषण आहार योजना, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा बालरोगतज्ज्ञ अधिकारी, प्रकल्प अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत सार्वजनिक वितरण प्रणाली, अन्न सुरक्षा योजनांची अंमलबजावणी, भिकमुक्त शहर करणे व त्यांची सुधारगृहात व्यवस्था करणे, लाभार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांचा आढावा तसेच विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. दरम्यान, शुक्रवार व शनिवारी राज्य अन्न आयोगाकडून नागपूर शहर व ग्रामीण भागातील विविध प्रकल्पांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली जाणार असून सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा सखोल आढावा घेण्यात येणार आहे.

## सन्मित्र सभा की नूतन कार्यकारिणी का पदग्रहण समारोह शनिवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आगामी १ अगस्त २०२६ शनिवार को राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ की कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर की प्रमुख उपस्थिति में संपन्न होगा। कवि एवं गीतकार अनिल शेंडे की अध्यक्षता में नवीन कार्यकारिणी का निर्विरोध निर्वाचन हुआ है। गोकुलपेठ स्थित डॉ. हेडगेवार रक्तपेढी. के अनंतराव भिडे सभागार में शाम ६ बजे यह समारोह होगा । नवीन कार्यकारिणी में डॉ. वृषाली शिलेदार सचिव, विनोद जोशी उपाध्यक्ष, विनोद देशमुख कोषाध्यक्ष, प्रवीण मुले एवं गजानन देशपांडे सहसचिव तथा अशोक पत्की, अँड सचिन नारळे, सौ. माधवी भूत, जयदेव धांडे, महेश वाबगावकर, शिव शाहू, अरुण केदार सदस्य चुने गए हैं। अध्यक्ष अनिल शेंडे एवं निवर्तमान अध्यक्ष राजन भूत ने सन्मित्र सभा के सदस्यों एवं हित चिंतकों से समारोह में उपस्थिति की प्रार्थना की है।

## प्रा. सुभाष खाकसे यांना 'ऑरेंज सिटी आयकॉन अवॉर्ड्स-२०२६' पुरस्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

महिमा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, आदिवासी निराधार महिला संस्था, अनुष्का शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, गुलमोहर सामाजिक संस्था आणि पुनम नवनिर्माण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नागपुरातील अमृत भवन येथे आयोजित "ऑरेंज सिटी आयकॉन अवॉर्ड्स-२०२६" सोहळ्यात लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्थेअंतर्गत प्रियदर्शनी शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य तथा कोरोना योद्धा प्रा. सुभाष खाकसे यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रसिद्ध समाजसेवक व इन्फंट इंडिया संस्थेचे अध्यक्ष दत्ता बरगजे यांच्या हस्ते, मुक्ता भारद्वाज, दयानंद कुबल, जयंत पाठक, योगेश पाचपोर, ऋतिका मसराम तसेच कार्यक्रमाच्या आयोजिका शितल पाटील व अरविंद गेडाम यांच्या उपस्थितीत त्यांना स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या सन्मान सोहळ्यास विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. सुभाष खाकसे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल परिसरातील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल प्रफुल दौलतराव सोमकुवर राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्काराने सन्मानित



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

प्रफुल दौलतराव सोमकुवर यांना सामाजिक व इतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संकल्प बहुउद्देशीय संस्था, पारस व ग्रामीण युवा बहुउद्देशीय संस्था, तुलंगा यांच्या सयुक्त विद्यमाने शेगांव येथे अयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रफुल दौलतराव सोमकुवर यांना प्रदान करण्यात आला. प्रफुल सोमकुवर हे नेहमी सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असतात समाजावरील अन्याय अत्याचारा विरोधात आवाज उठवने असो की विविध सामजिक संघटनाच्या माध्यमातून त्यांची निःस्वार्थपणे सामजिक काम करण्याची वृत्ती असो याच त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्कार २०२६ मान्यवराच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# सावनेरच्या १० हजार कोटींच्या खत प्रकल्पासाठी गेल व राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि. मध्ये सामंजस्य करार

### सावनेर येथे १.२७ एमएमटीपीए क्षमतेचा अत्याधुनिक खत निर्मिती प्रकल्प उभारणार, शेतकरी, उद्योग आणि रोजगाराला मिळणार मोठी चालना, आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या सततच्या प्रयत्नांना यश.

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथे गॅस-आधारित खत प्रकल्प उभारण्यासाठी गॅस ऑथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड आणि राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार झाल्याने सावनेर येथे प्रस्तावित सुमारे १० हजार कोटी रुपयांच्या खत प्रकल्पाच्या उभारणीला मोठी गती मिळाली आहे.



२९ जुलै २०२६ ला नवी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात या सामंजस्य करारावर गेलचे कार्यकारी संचालक (बिझनेस डेव्हलपमेंट व स्टार्ट-अप) संजय अग्रवाल आणि RCF च्या कार्यकारी संचालक (प्रकल्प, कॉर्पोरेट व समन्वय) ज्योती पाटील यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी गेलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपक गुप्ता तसेच गेलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक एस. शिवकुमार उपस्थित होते. दोन्ही कंपन्यांनी हा प्रकल्प भारताच्या अन्नसुरक्षेला बळकटी देणारा, विदर्भाच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा आणि हजारो रोजगार निर्मितीस हातभार लावणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

विशेष उद्देश कंपनी मार्फत हा प्रकल्प उभारण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात १.२७ दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष क्षमतेचा अत्याधुनिक युरिया उत्पादन प्रकल्प उभारण्याची योजना आहे. हा प्रकल्प गेलच्या मुंबई-नागपूर-झारसुगुडा नैसर्गिक वायू पाइपलाइनच्या बाजूने उभारण्यात येणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' अभियानाला बळ देतानाच देशातील युरिया व खत उत्पादन वाढविणे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या खत निर्मिती प्रकल्पासाठी सावनेरची निवड ही आमदार डॉ आशिषराव देशमुख यांचे दीर्घकालीन नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित ठरली.

या महत्त्वाकांक्षी खत प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना युरिया आणि इतर खतांची उपलब्धता वाढेल, दर स्थिर राहतील आणि आर्थिक लुबाडणुकीपासून संरक्षण मिळेल तसेच प्रादेशिक उद्योगवाढीला चालना मिळून रोजगाराचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडविता येईल. शेतकरी, उद्योग आणि रोजगाराला या प्रकल्पामुळे मोठी चालना मिळेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे याबद्दल आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.

सावनेर येथे प्रस्तावित या प्रकल्पासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १० एप्रिल २०२५ रोजी गेलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. त्यानंतर १७ जुलै २०२५ रोजी प्राथमिक चर्चा आणि ४ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीनंतर गेलने सकारात्मक भूमिका घेतली. अखेर १२ ऑगस्ट २०२५ रोजी गेलने अंतिम प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला, ज्यास मंजुरी देण्यात आली. पाण्याची उपलब्धता, नैसर्गिक वायू पाइपलाइन, उत्कृष्ट दळणवळण व्यवस्था, औद्योगिक विकासाची क्षमता आणि अन्नसुरक्षेचा विचार करून सावनेरची निवड करण्यात आली.

यानंतर १ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे न्यू इन्व्हेस्टमेंट पॉलिसी अंतर्गत या प्रकल्पाला मंजुरी देण्याची शिफारस केली. आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे पत्र केंद्रीय रसायन व खत मंत्रालयाला पाठविण्यात आले. दरम्यान, १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सावनेरचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख, GAIL आणि MIDC च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खुर्सापार, जटामखोरा, जलालखेडा आणि सावळी मोहतकर परिसरातील संभाव्य जागांची पाहणी करून प्रकल्पाच्या आराखड्याचा सविस्तर आढावा घेतला.

मुख्य म्हणजे, आमदार डॉ आशिषराव देशमुख हे २०२३ पासून विदर्भात खत निर्मिती प्रकल्प आणण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गेलचे वरिष्ठ अधिकारी तसेच केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, केंद्रीय आरोग्य व रसायन-खत मंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री अमित शाह यांच्याकडे त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. सावनेर येथे नैसर्गिक वायू पाइपलाइनसह आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याचे मत त्यांनी प्रभावीपणे मांडले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि राज्य शासनाच्या पुढाकारामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आता प्रत्यक्षात साकार होण्याच्या दिशेने निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे.

# महापूरातील २२४ निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली, ३५ वर्षानंतरही मोवाडच्या जखमा कायम

### महापुराच्या काळ्या आठवणींना उजाळा; विकासापासून वंचित पूरग्रस्त भागाकडे पुन्हा लक्ष वेधण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

३० जुलै १९९१ रोजी मोवाडसह परिसराला हादरवून सोडणाऱ्या भीषण महापुरात जलसमाधी मिळालेल्या निष्पाप नागरिकांना गुरुवारी मोवाड नगर परिषद परिसरातील स्मारकावर भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महापुराला ३५ वर्षे पूर्ण झाली असली तरी त्या भीषण आपत्तीच्या आठवणी आजही नागरिकांच्या मनात ताज्या असून, अनेकांच्या डोळ्यांत त्या काळाच्या स्मृतींनी अश्रू दाटून आले.



एकेकाळी "मोवाड झ सोन्याचे कवाड" म्हणून ओळखले जाणारे शहर महापुरानंतर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. या आपत्तीचा फटका मोवाडसह खैरगाव, देवळी, देवग्राम, मदना, जलालखेडा, पेठ मुक्तापूर आदी गावांना बसला. अनेक कुटुंबांनी आपले स्वकीय गमावले, तर हजारो नागरिक बेघर झाले. या महापुरात एकूण २२४ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता.

आजही पूरग्रस्त भाग विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. औद्योगिक विकास, रोजगार निर्मिती, दर्जेदार आरोग्य सुविधा, उच्च शिक्षण, सिंचन व्यवस्था आणि मूलभूत नागरी सुविधांचा अभाव असल्याने या भागातील युवकांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी आमदार चरणसिंग ठाकूर, जिल्हा नियोजन समिती सदस्य राजू हरणे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष नरेश अरसडे, उकेश चव्हाण, शिवसेना नगरसेवक ललित खंडेलवाल, मुख्याधिकारी अमोल परिहार, आजी-माजी नगरसेवक, नगर परिषद कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी महापुरातील मृतात्म्यांना दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली.

**पोलीस शहीदांनाही अभिवादन**

१९९१ च्या महापुरात कर्तव्य बजावताना जलसमाधी मिळालेल्या पोलीस शिपाई समाधान इंगळे आणि वामनराव मेंढे यांच्या स्मारकावर मोवाड पोलीस चौकी येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ठाणेदार मोकासे, साहेबराव मसराम, शुभम दीक्षित यांच्यासह पोलीस कर्मचारी व पोलीस मित्र उपस्थित होते.

**३५ वर्षानंतरही पुनर्वसनाचे प्रश्न कायम**

महापुरानंतर अनेक योजना जाहीर झाल्या; मात्र पूरग्रस्त भागाचा सर्वांगीण विकास अद्यापही अपूर्ण असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली. रोजगाराच्या संधी, लघुउद्योग, आधुनिक बाजारपेठ, आपत्ती व्यवस्थापन केंद्र आणि नदीकाठावरील संरक्षण भिंती यांसारख्या मागण्या आजही प्रलंबित असल्याचे नागरिकांनी सांगितले.

**लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीची चर्चा**

श्रद्धांजली कार्यक्रमासाठी काही प्रमुख लोकप्रतिनिधींना निमंत्रण देण्यात आले होते. मात्र स्थानिक खासदार, काही आमदार व अन्य वरिष्ठ नेते अनुपस्थित राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. महापुरासारख्या ऐतिहासिक आणि वेदनादायी घटनेच्या स्मरणदिनी सर्वपक्षीय उपस्थिती अपेक्षित होती, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

**नागरिकांची मागणी**

महापुरातील मृत नागरिकांच्या स्मृती जपण्यासाठी स्मारकाचे सुशोभीकरण, पूर संग्रहालय उभारणे, शालेय अभ्यासक्रमात मोवाड महापुराचा इतिहास समाविष्ट करणे, तसेच पूरग्रस्त भागासाठी स्वतंत्र विकास आराखडा राबविण्याची मागणी यावेळी करण्यात आली. "महापुराच्या वेदना विसरून चालणार नाहीत; त्या इतिहासातून भविष्यासाठी धडा घेणे आवश्यक आहे," अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# नागपूर सुधार प्रन्यासातील अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी

### शिवसैनिकांचा धरणे आंदोलनाचा इशारा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर सुधार प्रन्यासातील काही अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर आक्षेप घेत शिवसैनिकांनी निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. याबाबत कार्यकारी अधिकारी अनिल राठोड यांच्याकडे तक्रार करूनही कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. उलट संबंधित अधिकाऱ्यांची बाजू घेतली जात असल्याचा अनुभव आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात कार्यकारी अधिकारी अनिल राठोड, दीपाली पिसे, नीलम मॅडम तसेच संबंधित दिपालीचे पती कारचालक यांच्या कार्यपद्धतीची स्वतंत्र प्रशासकीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. चौकशीत दोषी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

शिवसैनिकांनी नागपूर सुधार प्रन्यासाच्या सभापतींकडे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास नागपूर सुधार प्रन्यास कार्यालयाच्या पार्किंग परिसरात लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नागपूर सुधार प्रन्यास प्रशासन व संबंधित अधिकारी यांची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला निरंजन दहिवले, नंदकिशोर माटे, सुनील मेश्राम सतिश उके, वैष्णवी लेपांडे, होमेश्वर लेपांडे, किशोर सोमकुवर उपस्थित होते.

# दोन महिन्यांतच कोसळली नाल्याची सुरक्षा भिंत!

### दवलामेटी ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह, ५ लाखांचा निधी पाण्यात? जागरूक नागरिकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

दवलामेटी ग्रामपंचायत अंतर्गत आंबेडकर नगर, तिजारे लेआउट येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सुमारे पाच लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेली नाल्याची सुरक्षा भिंत अवघ्या दोन महिन्यांतच पहिल्याच मुसळधार पावसात कोसळल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेमुळे बांधकामाच्या गुणवत्तेबाबत परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, नुकतीच बांधण्यात आलेली सुरक्षा भिंत मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसात पूर्णपणे जमीनदोस्त झाली. भिंत कोसळल्याने नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरांमध्ये शिरले. त्यामुळे नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून जीवितालाही धोका निर्माण झाल्याचे स्थानिकांनी सांगितले.

तक्रारदार नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सुरक्षा भिंतीच्या बांधकामात आवश्यक असलेले लोखंडी कॉलम, पिलर तसेच दर्जेदार साहित्याचा वापर करण्यात आलेला नाही. सिमेंटचा वापरही निकृष्ट दजार्चा व अपुरा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी, पहिल्याच जोरदार पावसात संपूर्ण भिंत कोसळल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या प्रकरणी जागरूक नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करून संपूर्ण बांधकामाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. शासनाचा निधी व नागरिकांच्या कराचा पैसा अशा निकृष्ट कामांमुळे वाया जात असल्याचा आरोप करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीत या कामासाठी जबाबदार असल्याचा आरोप करत ग्रामपंचायत प्रशासक गजानन रामेकर यांना पदावरून मुक्त करावे, कंत्राटदार प्रणय रंगारी यांचा परवाना रद्द करावा तसेच ग्रामसचिव सरला चिमोटे यांची तातडीने जिल्हा बदली करावी, अशी मागणी तक्रारदार रोहित राऊत, प्रशांत श्रीवास्तव, शुभम भालादरे यांच्यासह अन्य नागरिकांनी केली आहे.

या घटनेनंतर दवलामेटी परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, जिल्हाधिकारी या गंभीर प्रकरणात कोणती भूमिका घेतात आणि चौकशीत काय निष्पन्न होते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.